# शंकराचार्य स्वामी स्वरूपानंद सरस्वती यांचे देहावसान



**भोपाळ** : हिंदूंचे सर्वांत मोठे धर्मगुरू शंकराचार्य स्वामी स्वरूपानंद सरस्वती यांचे रविवारी (दि. ११) निधन झाले. ते ९९ वर्षांचे होते. मध्य प्रदेशातील नरसिंगपूर येथील परमहंसी गंगा आश्रमात त्यांनी अखेरचा श्वास घेतला. स्वामी स्वरूपानंद सरस्वती सनातन हिंदू धर्माचे आधारस्तंभ होते. ते दोन मठांचे (द्वारका आणि ज्योतिर्मठ) शंकराचार्य होते. त्यांचा जन्म मध्य प्रदेश राज्यातील सिवनी जिल्ह्यातील जबलपूरजवळील दिघोरी गावात झाला. वयाच्या अवघ्या नवव्या वर्षी त्यांनी धर्मकार्यासाठी घर सोडले. मागील बऱ्याच दिवसांपासून त्यांची प्रकृती अस्वस्थ होती. स्वामी स्वरूपानंद यांनी राम मंदिराच्या उभारणीसाठी दीर्घ कायदेशीर लढा दिला होता. स्वातंत्र्यलढ्यात ते तुरुंगातही गेले होते. त्यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त होत आहे.


सोमवार, १२ सप्टेंबर २०२२

◆ वर्ष १५ ◆ अंक ५५

www.ramprahar.com

# राम प्रहर

◆ पाने ८ ◆ किंमत ₹२ ◆ रायगड


## अंतरंग


कोकण रेल्वे मार्गावर धावणार विद्युत इंजिन/२

रॅगिंग करणाऱ्या चार विद्यार्थ्यांवर गुन्हा दाखल/३

रोड सेफ्टी वर्ल्ड सिरीजमध्ये भारताची विजयी सलामी/८


# भाजपतर्फे सेवा पंधरवडा; विविध उपक्रम




(छाया : चेतन पोपटा)

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

देशाचे यशस्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा वाढदिवस ते राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची जयंती या काळात भारतीय जनता पक्षाच्या वतीने विविध सेवाकार्य असलेल्या सेवा पंधरवड्याचे आयोजन करण्यात आले आहे. देशभर चालणाऱ्या या उपक्रमात रायगड जिल्ह्याचा वाटा महत्त्वाचा असेल, असे प्रतिपादन भाजपच्या राष्ट्रीय सचिव, महिला मोर्चाच्या माजी राष्ट्रीय अध्यक्ष आणि राज्य महिला आयोगाच्या माजी अध्यक्ष विजया रहाटकर यांनी रविवारी (दि. ११) येथे केले.

सेवा पंधरवड्याच्या अनुषंगाने उत्तर व दक्षिण रायगड जिल्ह्याची नियोजन बैठक विजया रहाटकर यांच्या मार्गदर्शनाखाली आणि आमदार महेश बालदी यांच्या प्रमुख उपस्थितीत पनवेल मार्केट यार्डमधील श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या सभागृहात झाली. या बैठकीस भाजपचे रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी ऑनलाइन पद्धतीने सहभाग घेऊन संवाद साधला, तर भाजपचे प्रदेश कार्यकारिणी सदस्य बाळासाहेब पाटील, माजी महापौर डॉ. कविता चौतमोल, भाजपचे तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, शहराध्यक्ष जयंत पगडे, जिल्हा संघटन सरचिटणीस अविनाश कोळी, श्रीनंद पटवर्धन, माजी सभागृह नेते परेश ठाकूर, महिला मोर्चाच्या जिल्हाध्यक्ष अश्विनी पाटील, भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष के. के. म्हात्रे, प्रल्हाद केणी, सुनील घरत, निळकंठ घरत, सतीश धारप, रमेश मुंढे, दीपक बेहेरे, वैकुंठ पाटील, मिलिंद पाटील, राजेश मपारा, उरण तालुका अध्यक्ष रवी भोईर, शहर अध्यक्ष कौशिक शाह, कर्जत तालुकाध्यक्ष मंगेश म्हसकर, खालापूर तालुकाध्यक्ष रामदास ठोंबरे, खारघर अध्यक्ष ब्रिजेश पटेल, कळंबोली अध्यक्ष रविनाथ पाटील, महिला मोर्चा पनवेल तालुकाध्यक्ष रत्नप्रभा घरत यांच्यासह विविध सेलचे पदाधिकारी, लोकप्रतिनिधी उपस्थित होते.

विजया रहाटकर यांनी या उपक्रमाच्या आयोजनाबद्दल मार्गदर्शन करताना सांगितले की, देशाला जगात ताकदवान बनविण्याचे काम करणारे यशस्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात केंद्र सरकार सेवा, सुशासन आणि गरीब कल्याणासाठी वचनबद्ध आहे. ते अंत्योदयाचा संकल्प देत देशातील गोरगरीब, शोषित व वंचित वर्गाच्या कल्याणाकरिता देशसेवेचे ध्येय साध्य करीत विविध जनकल्याणकारी योजना समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहचविण्यासाठी समर्पित भावनेने कार्यरत असतात. त्या अनुषंगाने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा वाढदिवस ते राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची जयंती या काळात भारतीय जनता पक्षाच्या वतीने १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबरपर्यंत सेवात्मक, रचनात्मक, व्यक्तिमत्व आणि कर्तृत्व अशा विविध सेवाकार्य असलेल्या सेवा पंधरवड्याचे आयोजन करण्यात आले आहे.

या पंधरवड्यात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या जीवनावरील प्रदर्शन, मोदी २० बूकचे स्टॉल, जनकल्याणकारी कामाबद्दल धन्यवाद पत्र, रक्तदान शिबिर, आरोग्य शिबिर व कोविड प्रतिबंधात्मक लसीकरण, बुद्धिजीवी संमेलन, दिव्यांगांसाठी कृत्रिम अवयव वितरण व वयोश्री योजनेचे कॅम्प, २०२५पर्यंत क्षयरोगमुक्त भारत करण्यासाठी रुग्णांना दत्तक घेत त्यांचे उपचार व काळजी घेण्यासंदर्भात मोहीम, एक भारत श्रेष्ठ भारत संदेश देणारे मेळावे, जिल्ह्यातील स्थानिक उत्पादने व व्यवसायांना प्रोत्साहन देण्यासाठी व्होकल फॉर लोकल, २५ सप्टेंबरला पंडित दीनदयाळ उपाध्याय यांची जयंती प्रत्येक बूथवर साजरी करणे तसेच त्या दिवशी महिन्यातील शेवटचा रविवार असल्याने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा मन की बात कार्यक्रम होणार आहे. **(पान २ वर..)**

**महाराष्ट्र प्रदेश भाजपची कार्यकारिणी बैठक दोन महिन्यांपूर्वी पनवेलमध्ये झाली. अत्यंत सुंदर आणि शिस्तबद्ध नियोजन या बैठकीचे होते. या बैठकीच्या नियोजनाबद्दल संपूर्ण राज्यात वाहवा झाली. अभिमानास्पद आयोजनाबद्दल मी आमदार प्रशांत ठाकूर व त्यांच्या सहकाऱ्यांचे या बैठकीतून आभार मानते आणि कौतुक करते.**
**-विजया रहाटकर,**
**राष्ट्रीय सचिव, भाजप**

# पनवेलमध्ये महाविकास आघाडीला लागली गळती

## राष्ट्रवादी, शेकापच्या पदाधिकाऱ्यांचा समर्थकांसह शिंदे गटात जाहीर प्रवेश



**पनवेल : वार्ताहर**

राष्ट्रवादी काँग्रेसचे पनवेल शहर जिल्हा सचिव चंद्रकांत राऊत, शेतकरी कामगार पक्षाचे माजी नगरसेवक शिवाजी थोरवे आणि कामोठे येथील अर्जुन डांगे यांनी रामदास शेवाळे यांच्या नेतृत्वाखाली शिंदे गटात प्रवेश केला आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पक्षप्रवेशकर्त्यांचे स्वागत केले.

शिवसेना नेते एकनाथ शिंदे यांनी उठाव करून भारतीय जनता पक्षासोबत राज्यात सरकार स्थापन केले. त्यांच्यासमवेत ५० आमदार, १२ खासदार, जिल्हाप्रमुख व इतर पदाधिकाऱ्यांनी उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेला अखेरचा 'जय महाराष्ट्र' केला. आजही मोठ्या प्रमाणात पदाधिकारी शिंदे गटात प्रवेश करीत असून महाविकास आघाडीतील घटक पक्षांनादेखील सुरूंग लावण्याचे काम सुरू आहे.

राष्ट्रवादी काँग्रेसचे पनवेल शहर जिल्हा सचिव चंद्रकांत राऊत यांनी शिंदे गटात सहभागी होण्याचा निर्णय घेतला. जिल्हा सचिव म्हणून गेल्या चार वर्षांपासून राऊत काम करीत होते. शेकापचे माजी नगरसेवक शिवाजी थोरवे आणि कामोठे शहर उपाध्यक्ष अर्जुन डांगे यांनीसुद्धा शिंदे गटाची कास धरली. त्यांच्यासोबत सुनील चिलप, मच्छींद्र झगडे, संतोष मंजुळे, सुभाष गोळे, महेश नायडू, ऋषिकेश शर्मा, अनिल सिंग, अमोल चिलप, नामदेव मुळीक, शंकर मुळीक, जयदीप थोरवे, साहिल चिलप, अमोल पारठे, अनिल राऊत, दत्ता वाबळे अविनाश परखांदे यांनीही पक्षप्रवेश केला.

मुख्यमंत्र्यांच्या मुंबईतील वर्षा निवासस्थानी झालेल्या या पक्षप्रवेश कार्यक्रमास पक्षाचे सचिव संजय मोरे, लातूर जिल्ह्याचे संपर्कप्रमुख ॲड. श्रीनिवास क्षीरसागर, पुण्याचे सागर सैदाने, पनवेल जिल्हा संपर्कप्रमुख रामदास शेवाळे, महानगरप्रमुख ॲड. प्रथमेश सोमण, तालुकाप्रमुख रूपेश ठोंबरे उपस्थित होते.



## निवडक

### जेईई ॲडव्हान्स परीक्षेत मुंबईचा आर. के. शिशिर देशात पहिला

**मुंबई** : इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीकडून (आयआयटी) संयुक्त प्रवेश परीक्षेचा (जेईई ॲडव्हान्स) निकाल रविवारी (दि. ११) जाहीर करण्यात आला. या परीक्षेत आयआयटी मुंबई झोनचा आर. के. शिशिर ३६० पैकी ३१४ गुण मिळवून देशात प्रथम आला आहे, तर आयआयटी दिल्ली झोनची तनिष्का काबरा ही देशातून मुलींमध्ये प्रथम आली आहे. तिला ३६० पैकी २७७ गुण मिळाले.

### भरधाव कंटेनरने कारला दोन किमी नेले फरफटत

**पुणे** : पुणे-अहमदनगर महामार्गावर शिक्रापूर येथे भरधाव कंटेनरने कारला तब्बल दोन किलोमीटर फरफटत नेल्याची घटना सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाली आहे. या वेळी महामार्गावर आगीच्या ठिणग्या उडत होत्या. सुदैवाने या कारमधून प्रवास करणारे चारही जण बचावले आहेत.

# बिस्किटच्या बॉक्समधून गांजाची वाहतूक

## नेरळ पोलिसांनी कारचा पाठलाग करून एकाला पकडले

**कर्जत : बातमीदार**

बिस्किटच्या बॉक्समधून गांजाची वाहतूक करणारी एक कार नेरळ पोलिसांनी पाठलाग करून पकडल्याची घटना शनिवारी (दि. १०) पहाटे घडली. या वेळी अंधाराचा फायदा घेऊन सूत्रधार पळून गेला, मात्र कारचालक पोलिसांच्या हाती लागला आहे. पोलिसांनी कारमधील २६ किलो गांजा जप्त केला असून या प्रकरणी गुन्हा दाखल केला आहे.

अनंत चतुर्दशीला गणेश विसर्जन झाल्यानंतर नेरळ पोलिसांकडून रात्रीची गस्त घातली जात होती. कल्याण फाटा येथे शनिवारी पहाटे चारच्या सुमारास एक इर्टिगा कारला (एमएच ०५ इएल ०४६४) पोलिसांनी शिटी वाजवून थांबविण्याचा प्रयत्न केला, मात्र ती गाडी सुसाट वेगाने कर्जतकडे निघून गेली. पोलिसांनी पाठलाग करून ती अडविली असता या कारमध्ये विक्रीसाठी चालविलेला तब्बल २६ किलो गांजा आढळून आला. याची किंमत सुमारे सव्वा लाख रुपये आहे.

### २६ किलो गांजा जप्त



(छाया : संतोष पेरणे)

या प्रकरणी पोलिसांनी कारचालकाला अटक केली असून मुख्य सूत्रधाराचे मोबाइल पोलिसांच्या हाती लागल्याने त्याच्यापर्यंत पोहचण्यास मदत होणार आहे. त्याचा शोध सुरू असून हा गांजा कुठे नेला जात होता याचाही तपास सुरू आहे. **(अधिक वृत्त पान ५ वर..)**

# धाटाव एमआयडीसीत चार कामगार भाजले

## एक्सेल कंपनीमध्ये दुर्घटना, एकाची प्रकृती चिंताजनक

**धाटाव : प्रतिनिधी**



(छाया : जितेंद्र जाधव)

रोह्यातील धाटाव औद्योगिक वसाहतीमधील एक्सेल कारखान्यात काम करीत असताना आगीच्या ज्वाळा अंगावर आल्याने चार कामगार जखमी झाले. त्यातील एकाची प्रकृती चिंताजनक आहे.

एक्सेल इंडस्ट्रीज लि.मध्ये शनिवारी (दि. १०) दुपारी साडेचारच्या सुमारास ही दुर्घटना घडली. कारखान्यातील ड्रममधून घातक मटेरियल बाहेर काढत असताना अचानक आग लागली. आगीच्या ज्वाळा अंगावर येऊन कंत्राटी कामगार रामचंद्र ढमाल गंभीर जखमी झाले, तर हरेश तळकर किरकोळ जखमी झाले. इतर दोन जखमी कामगारांची नावे समजू शकली नाहीत. दरम्यान, रामचंद्र ढमाल यांना पुढील उपचारासाठी ऐरोली येथील नॅशनल बर्न हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले आहे, अशी माहिती कारखाना निरीक्षक केशव केंद्रे यांनी दिली.

कारखाना निरीक्षक केशव केंद्रे यांनी पुढे सांगितले की, एक्सेल कारखान्यातील दुर्घटना शनिवारी सायंकाळी साडेचारच्या सुमारास घडली होती, पण कंपनी प्रशासनाने आमच्या विभागाला कळविले नव्हते. रात्री साडेआठच्या सुमारास भाजप युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष अमित घाग यांनी या घटनेबद्दल माहिती दिली. त्या माहितीच्या आधारे केलेल्या प्राथमिक चौकशीतून एकूण चार कामगार फॉस्पोरस पेंटा सल्फेट या रसायनाने भाजले असून त्यातील एकाची प्रकृती चिंताजनक आहे. या संदर्भात मी स्वतः कारखान्यात जाऊन दुर्घटनेची सखोल चौकशी करून अहवाल तयार केला आहे. तो वरिष्ठांना सादर करून योग्य ती कारवाई केली जाईल.

**ही दुर्घटना अतिशय चिंताजनक अशी बाब आहे, पण एक्सेल कारखान्यातील अपघात नवे नाहीत. कंपनी प्रशासन जास्त उत्पादन काढण्यासाठी कमी कामगार व कंत्राटी कामगारांचा वापर करतात तसेच सुरक्षेची काळजी घेतली जात नाही. त्यामुळे आगामी काळात पर्यावरणमंत्री व उद्योगमंत्री यांची भेट घेऊन कंपनीत योग्य त्या उपाययोजना होण्यासाठी तसेच कामगारांच्या सुरक्षेसाठी आम्ही पाठपुरावा करणार आहोत.**
**-अमित घाग, भाजप युवा मोर्चा दक्षिण जिल्हाध्यक्ष**

# माणगावात वर्षातून तीनदा भातपीक घेण्याचा प्रयोग

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगावमधील एका उद्योजक शेतकऱ्याने वर्षातून तीन वेळा भाताचे उत्पादन घेण्याचा निश्चय केला आहे. त्याचा हा प्रयोग यशस्वी झाल्यावर माणगाव तालुका हा भाताचे विक्रमी उत्पादनाचे कोठार म्हणून ओळखला जाणार आहे.

कोकणातील शेतकरी पावसाच्या पडणाऱ्या पाण्यावर अवलंबून असून इथली भातशेती एकपिकी असल्याने बहुतांशी तरुणवर्ग मुंबई, सुरतमध्ये रोजगारासाठी मोठ्या प्रमाणात स्थलांतरित होतो, परंतु कोकणात वर्षातून तीन वेळा भातशेती पिकविल्यास शेतकऱ्यांचे आर्थिक संकट दूर होईल या दृष्टीने माणगावचे प्रसिद्ध उद्योजक तथा धनंजय राइस मिलचे मालक व शेतकरी विजयशेठ मेथा भातवाले यांनी तळेगाव येथील आपल्या दोन एकर जमिनीवर भातपिकाची लागवड सप्टेंबर महिन्याच्या पहिल्या आठवड्यात केली असून हे पीक तीन महिन्यांत तयार झाल्यानंतर पुन्हा याच जागेवर तीन महिन्यांत तयार होणारे कर्जत ८४ जातीचे दुसरे पीक ८४ दिवसांत घेतले जाणार आहे. त्यानंतर तिसरे पीक पुढील तीन महिन्यांत घेतले जाणार आहे.

विजयशेठ मेथा यांनी स्वतः आपल्या जमिनीत मजुरांसोबत उतरून वर्षातून तीन वेळा भाताचे उत्पादन घेण्याचा निर्धार करीत जिल्ह्यातील शेतकऱ्यांपुढे वेगळा आदर्श ठेवला आहे.

### पोषक पावसामुळे बळीराजा आनंदात

*सध्या माणगाव तालुक्यात औद्योगिकीकरणासाठी भूसंपादनाचे काम वेगात सुरू आहे. त्यामुळे तालुक्यात वरकस व भातपिकाचे क्षेत्र यंदा घटले असले तरी २०६ गावांतील शेतकऱ्यांनी १२,५८९ हेक्टर क्षेत्रावर भातपिकाची लागवड केली आहे. चालू वर्षी पिकाला पोषक असा पाऊस पडल्याने भाताचे पिक पोटऱ्यात आले असून ते फुलले आहे. त्यामुळे शेतकरी आनंदात आहे.*



(छाया : सलीम शेख)

# पुण्यात ढगफुटीसदृश पावसामुळे दाणादाण

**पुणे : प्रतिनिधी**

पुण्यात रविवारी (दि. ११) अचानक पडलेल्या ढगफुटीसदृश पावसामुळे नागरिकांची तारांबळ उडाली. पुण्यातील अनेक सखल भागांमध्ये पाणी साचले होते. त्यामुळे वाहतुकीवरही परिणाम झाल्याचे दिसून आले.

हवामान विभागाने मुसळधार पावसाचा अंदाज वर्तविला होता. त्यानुसार रविवारी सायंकाळी पावसाच्या जोरदार सरी बरसल्या. यामुळे पुण्यातील रस्ते जलमय झाले. पुण्याच्या मध्यवर्ती भागासह उपनगरातही मुसळधार पाऊस पडल्याने पाण्याचे लोंढे वाहू लागले. अनेक ठिकाणी वाहतुकीची कोंडी झाली होती. दरम्यान, राज्यात पावसाचा जोर अधिक वाढणार आहे. तसा इशारा हवामान खात्याने दिला आहे.

# ब्रेस्ट कॅन्सरसंदर्भात जनजागृती रॅली

## पनवेलमध्ये महिलांसाठी 'रोटरी'चा उपक्रम



**पनवेल : वार्ताहर**

येथील रोटरी क्लब आणि इनरव्हील क्लबच्या वतीने पनवेलमध्ये महिलांच्या ब्रेस्ट कॅन्सरसंदर्भात जनजागृती बाईक रॅली आयोजित करण्यात आली होती. अर्चना परेश ठाकूर यांनी झेंडा दाखवून रॅलीला प्रारंभ केला.

या उपक्रमावेळी रोटरी क्लब ऑफ पनवेल सिटीच्या अध्यक्ष ध्वनी तन्ना, मेन्टोर क्लबचे हर्मेश तन्ना, सिम्पल आचालिया, इनरव्हील क्लब ऑफ पनवेल सिटीच्या अध्यक्ष हेतल बालड, सचिव गिरा चव्हाण, बिजल मिराणी, ममता ठाकूर, डॉ. फोरम ठक्कर, डॉ. वैभव ठक्कर आदी उपस्थित होते. रॅलीमध्ये मोठ्या संख्येने महिला सहभागी झाल्या होत्या. या रॅलीची सुरुवात पनवेल शहरातील ज्येष्ठ नागरिक सभागृह येथून करण्यात आली, तर ओरियन मॉल येथे समारोप झाला.

महिलांना आपण अनेकदा ब्रेस्ट कॅन्सरसारख्या गंभीर आजाराने ग्रस्त झालेल्या पाहतो. त्यांना या आजाराचा सामना करताना औषधोपचारासह मानसिक आधार व हिमतीची गरज असते. अशा रॅलीमुळे सर्वांना याचे गांभीर्य कळेल, असे मत अर्चना ठाकूर यांनी या वेळी व्यक्त केले.

# जनसामान्यांसाठी कामकाज अधिक गतिमान करा

## मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे प्रशासनाला निर्देश



**मुंबई : प्रतिनिधी**

ग्रामीण भागातील जनतेला त्यांच्या कामांसाठी मंत्रालयात येण्याची आवश्यकता भासू नये. स्थानिक पातळीवरच त्यांचा प्रश्न निकाली निघावा. सामान्यांना लोकाभिमुख, पारदर्शक प्रशासन अनुभवता यावे म्हणून क्षेत्रीय पातळीवर कार्यरत असलेल्या विभागीय मुख्यमंत्री सचिवालयाचे कामकाज अधिक गतिमान करावे. नागरिकांनीदेखील आपल्या तक्रारी, निवेदने, अर्ज विभागीय मुख्यमंत्री सचिवालयात सादर करावे, असे आवाहन मुख्यमंत्र्यांनी केले आहे.

सुशासन नियमावलींसंदर्भात मुख्यमंत्र्यांनी नुकत्याच घेतलेल्या बैठकीत विभागीय मुख्यमंत्री सचिवालयाच्या कामकाजाविषयी चर्चा झाली. नागरिकांची शासनस्तरावर असलेली कामे, त्यासंदर्भात प्राप्त होणारे अर्ज, निवेदने, आदी मंत्रालयातील मुख्यमंत्री सचिवालयात स्विकारून त्यावर कार्यवाही करण्यासाठी संबंधीत क्षेत्रीयस्तरावर कार्यवाहीसाठी पाठविण्यात येतात, मात्र यामध्ये अधिक लोकाभिमुखता, पार्दशकता, गतिमानता आणतानाच सर्वसामान्य जनतेला कमी त्रास व्हावा या हेतूने कोकण, अमरावती, पुणे, नाशिक, औरंगाबाद, नागपूर येथील विभागीय आयुक्त कार्यालयांमध्ये मुख्यमंत्री सचिवालयाचे क्षेत्रीय कार्यालय (सीएमओ) यापूर्वीच सुरू करण्यात आले आहे.

विभागीय आयुक्त कार्यालयांमधील महसूल उपायुक्तांना विभागीय मुख्यमंत्री सचिवालयाचे पदसिद्ध विशेष कार्य अधिकारी घोषित करण्यात आले आहे. ते याबाबत संनियंत्रण करीत असून विभागीय कक्षांमध्ये अर्ज स्विकारणे, पोचपावती देणे, अर्जावर कार्यवाही करणे तसेच प्राप्त अर्ज, त्यावरील कार्यवाही केलेले अर्ज व प्रलंबित अर्ज इ. बाबतचा मासिक अहवाल मुख्यमंत्री सचिवालयाला पाठवितात. मंत्रालयातील मुख्यमंत्री सचिवालयाचे या क्षेत्रियस्तरावरील मुख्यमंत्री कार्यालयावर संनियंत्रण केले जात आहे.

माहिती अधिकारान्वये प्राप्त होणाऱ्या माहिती अर्जावर प्रशासकीय विलंब टाळण्याच्या दृष्टीने व तातडीने कार्यवाही होण्यासाठी सर्व विभागीय आयुक्त कार्यालयांमधील मुख्यमंत्री सचिवालय कक्षात जन माहिती अधिकारी, सहायक जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांना पदनिर्देशित करण्यात आले आहे.

### ऋषिकेश यात्रेला गेलेल्या महाराष्ट्रातील अपघातग्रस्तांना मदत

**उत्तराखंडमधील ऋषिकेश येथे तीर्थयात्रेसाठी गेलेल्या महाराष्ट्रातील चौघा यात्रेकरूंचा भीषण अपघातात मृत्यू झाला. या अपघाताची माहिती मिळताच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी तातडीने यंत्रणा कामाला लावली आणि अपघातातील जखमींना ऋषिकेश येथील एम्स हॉस्पिटलमध्ये उपचाराची सुविधा उपलब्ध करून दिली. मृत्यूमुखी पडलेल्या चौघा यात्रेकरूंचे पार्थिव राज्यात आणण्यासाठी मुख्यमंत्र्यांनी व्यक्तीश: लक्ष घालत ते मुंबईत आणले आणि नातेवाईकांकडे सुपूर्द झाले. या दु:खद प्रसंगात मुख्यमंत्र्यांनी केलेली तातडीची मदत नातेवाईकांसाठी दिलासा देणारी ठरली. हे सर्वसामान्यांचे सरकार आहे, हेच यातून अधोरेखित झाले आहे, अशी भावना अपघातग्रस्तांचे नातेवाईक दयानंद सावंत यांनी व्यक्त केली आहे.**

# कोकण रेल्वे मार्गावर धावणार विद्युत इंजिन

**मुंबई : प्रतिनिधी**

कोकण रेल्वेने दादर ते सावंतवाडी एक्सप्रेस, तुतारी एक्सप्रेस, मंगला एक्स्प्रेस, मांडवी एक्सप्रेस, कोकणकन्या एक्स्प्रेस आणि दिवा-सावंतवाडी एक्स्प्रेस पूर्णपणे विद्युत इंजिनवर चालविण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे १५ सप्टेंबरपासून कोकणात जाणाऱ्या रेल्वे गाड्यांची गती वाढणार आहे.

रेल्वे मंत्रालयाने २०१६मध्ये कोकण रेल्वेच्या विद्युतीकरणाला मंजुरी दिली होती. रत्नागिरी ते थिवीमदरम्यान विद्युतीकरण पूर्ण झाल्याने कोकण रेल्वेच्या अखत्यारीत येणाऱ्या ९७० किमी लांबीच्या रुळांवर विद्युतीकरण मार्च २०२२मध्ये पूर्ण झाले आहे. या विद्युतीकरणासाठी एकूण एक हजार २८७ कोटी खर्च करण्यात आला आहेत.

आता टप्प्याटप्प्याने प्रवासी गाड्या विद्युत इंजिनवर चालविण्याचे नियोजन कोकण रेल्वेने केले आहे. त्यानुसार, दादर ते सावंतवाडी एक्सप्रेस, तुतारी एक्सप्रेस, मंगला एक्स्प्रेस आणि मांडवी, कोकणकन्या एक्स्प्रेस आणि दिवा-सावंतवाडी एक्स्प्रेस पूर्णपणे विद्युत इंजिनावर चालविण्याचा निर्णय घेतला आहे. कोकण रेल्वेच्या अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार, मुंबई ते रोह्यापर्यंत विद्युतीकरण असल्याने विद्युतप्रवाहावरील इंजिने मेल, एक्स्प्रेस गाड्यांना चालविण्यात येत होते. रोहा स्थानकांपुढे विद्युतीकरण नसल्याने डिझेल इंजिन जोडून गाड्या मार्गस्त करावे लागत होते. आता विद्युतीकरण पूर्ण झाल्याने टप्प्याटप्प्याने सर्व गाड्या विद्युत इंजिनवर धावणार आहेत.

# केंद्रीय मंत्री नितीन गडकरींनी मानले अक्षय कुमारचे आभार

**मुंबई : प्रतिनिधी**



अभिनेता अक्षय कुमार हा उत्तमोत्तम चित्रपट प्रेक्षकांसाठी घेऊन आला आहेच, पण समाजिक कार्यातही तो मागे नाही. काही महत्त्वाच्या विषयांवर लोकांमध्ये जनजागृती घडवण्याचे काम तो करीत असतो. विविध समाजिक मुद्यांना हात घालणाऱ्या जाहिरातींमध्ये तो झळकत असतो. नुकतेच रस्ता सुरक्षेच्या एका जाहिरातीत त्याने काम केले असून नागरिकांना प्रवास करताना घ्याव्या लागणाऱ्या सुरक्षेची त्याने माहिती दिली आहे. त्यासाठी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी अक्षयचे आभार मानले आहेत.

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी अक्षय कुमारचा एक व्हिडीओ शेअर केला आहे. या व्हिडीओत सीटबेल्ट आणि एअरबॅगच्या आवश्यकतेकडे प्रेक्षकांचे लक्ष वेधत गाडीत सहा एअरबॅग्सची किती आवश्यकता असते हे तो सांगत आहे. ते सांगताना अक्षय कुमार कारमधील एअरबॅगच्या महत्त्वाविषयी चर्चा करताना दिसत आहे. या जाहिरातीत या व्हिडिओमध्ये नुकतेच लग्न झालेल्या मुलीच्या पाठवणीचा प्रसंग दाखवण्यात आला आहे. ज्या गाडीमध्ये सर्व प्रवाशांसाठी सीटबेल्ट उपलब्ध आहे, त्याच गाडीत मुलीची पाठवणी करा, असा आग्रह मुलीच्या वडिलांना अक्षय कुमार करताना दिसत आहे. या व्हिडीओमार्फत प्रवासादरम्यान सुरक्षिततेसाठी सीटबेल्ट लावण्याच्या गरजेबाबत सांगण्याचा प्रयत्न अक्षय कुमारने केला आहे.

अक्षय कुमार, देशव्यापी राष्ट्रीय रस्ता सुरक्षा मोहिमेला पाठिंबा दिल्याबद्दल तुझे आभार. रस्ते सुरक्षेच्या मुद्द्यांवर जागरूकता पसरवण्याचे तुझे प्रयत्न खरोखर कौतुकास्पद आहेत. आम्ही जागरूकता आणि लोकसहभागाने भारतातील रस्ते अपघात कमी करण्यासाठी वचनबद्ध आहोत, असे ट्वीट ना. नितीन गडकरी यांनी केले.

## विसर्जन मिरवणुकीत मोबाइल चोरणारा गजाआड

**पुणे : प्रतिनिधी**

विसर्जन मिरवणुकीत मोबाइल लांबविणाऱ्या हरियाणातील चोरट्याला फरासखाना पोलिसांनी पकडले. त्याच्याकडून मोबाइल चोरीचे आणखी गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता आहे. सहदेवसिंग चहलसिंग चौहान (वय ३०, रा. सिकंदरपूर, जि. पलवाल, हरियाणा) असे अटक करण्यात आलेल्याचे नाव आहे.

याबाबत एका अल्पवयीन मुलाने फरासखाना पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. तक्रारदार मुलगा कोथरुड भागात राहायला आहे. विसर्जन मिरवणूक पाहण्यासाठी बेलबाग चौकात आला होता. त्या वेळी गर्दीत मुलाकडील दहा हजारांचा मोबाइल संच चौहानने हिसकावला. मुलाने आरडाओरडा केला. बंदोबस्तावरील पोलिसांनी त्याला पकडले. चौहान याने विसर्जन मिरवणुकीत आणखी काही जणांचे मोबाईल संच हिसकावल्याचा संशय असून सहायक पोलीस निरीक्षक शिंदे तपास करीत आहेत.

# उरणमध्ये फसल विमा पाठशाळा उपक्रम

**उरण : बातमीदार**

तालुक्यातील चिरनेर येथे शनिवारी (दि. १०) प्रधानमंत्री पिक विमा योजना खरीप २०२२अंतर्गत फसल विमा पाठशाळा उपक्रम राबवण्यात आला.

'फसल विमा पाठशाळा'मध्ये प्रधानमंत्री पीक विमा योजनेत शेतकऱ्यांना प्रतिकूल हवामानामुळे पिकांच्या पेरणीपासून ते काढणी पश्चात नुकसानीपर्यंत विमा संरक्षण याबाबत माहिती देण्यात आली. या कार्यक्रमाला कृषी पर्यवेक्षक शिवाजी लोहकरे, कृषि सहाय्यक निखिल देशमुख, सरपंच संतोष चिर्लेकर, कृषिमित्र प्रफुल्ल खारपाटील, ॲग्रीकल्चर इन्शुरन्स कंपनीचे तालुका समन्वयक जितेंद्र पिंपळे व महागणपती सेंद्रिय शेतीगट चिरनेरचे शेतकरी बांधव उपस्थित होते.



# सीबीडीत भाद्रपद पौर्णिमा धम्मदेशना सोहळा उत्साहात

**नवी मुंबई : प्रतिनिधी**



बौद्धसेवा निवृत्त अधिकारी कर्मचारी संघ सीबीडी नवी मुंबईच्या वतीने सेक्टर ८ येथील संविधान सभागृहात भाद्रपद पौर्णिमेनिमित्त धम्मदेशनेचा सोहळा झाला. बोधीवृक्ष रोपण, संविधान सभागृह प्रवेशद्वार अनावरण, आदर्श माता-पिता सन्मान व खीरदान करण्यात आले.

या वेळी जिल्हा न्यायाधिश (नि) डॉ. यशवंत चावरे, भाजपचे माजी खासदार डॉ. सुनील गायकवाड, भंते आर्यप्रज्ञाशाक्य, भंते शांतीरत्न आदी उपस्थित होते. धम्मदेशनेत बौद्धसंस्कृती आणि बौद्धांची कर्तव्य यावर मान्यवरांनी मार्गदर्शन केले.

सर्वश्री उपासक जे. डी. कसबे, आशा शिंदे, मंदा भंडारे, यमुनाबाई वाघमारे, माया सोनकांबळे, नारायण वाघमारे, प्रा. अनिक गायकवाड यांनी भिक्खु संघाला खीरदान केले, तर प्रा. डॉ. प्रतिभा हावरगेकर यांनी उपस्थितांना खीरदान केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या धम्मक्रांतीचे फलित यावर प्रा. डॉ. जी. के. डोंगरगावकर यांनी मार्गदर्शनपर भाष्य केले. राहूल शिक्षण प्रसारक मंडळाचे विविध उपक्रम हे बुद्ध तत्त्वज्ञान आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांवर चालणारे आहेत. भविष्यात इथे मोफत आरोग्य शिबिर, कायदा मार्गदर्शन, विपश्यना, योगा व नशामुक्ती केंद्र उभारण्यात येणार आहे, तसेच बेलापूर विभागातील झोपडपट्टी बहुल परिसरातील सुमारे दोन हजार विद्यार्थ्यांकरिता मोफत अभ्यासिका सुरू करण्यात येणार असल्याचे प्रा. डॉ. जी. के डोंगरगावकर यांनी जाहीर केले.

या कार्यक्रमात पंचशिल महिला मंडळ, मराठवाडा सेवा संघ, बुद्धिस्ट स्टुडंट फेडरेशन, सीबीडी झोपडपट्टी सेवासंघाचे नारायण वाघमारे, तुकाराम कांबळे, बळी मोरे, किशोर शिंदे, सुजीत शिंदे, रामकिशन सुर्यवंशी यांसह कार्यकर्ते उपस्थित होते.

## जिल्हास्तरीय निबंध स्पर्धेत धाटावची गायत्री प्रथम

**रेवदंडा : प्रतिनिधी**

नेहरु युवा केंद्र संघटन आणि ओएसिस संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने जलमंत्रालयाच्या 'कॅच द रेन' या उपक्रमांतर्गत आयोजित जिल्हास्तरीय निबंध स्पर्धेचा निकाल जाहीर झाला. यामध्ये रोहे-धाटावची गायत्री गिरप हिने प्रथम क्रमांक पटकावला. नुकताच नेहरु युवा केंद्र संघटनेच्या कार्यालयात आयोजित बक्षीस वितरण सोहळ्यात प्रमाणपत्र, स्मृतिचिन्ह तथा भेटवस्तू देऊन तिचा गुणगौरव करण्यात आला.



या वेळी नेहरु युवा केंद्र संघटनचे जिल्हा युवा अधिकारी निशांत रौतेला, ओएसिस संस्थेचे संस्थापक अध्यक्ष प्रतिक कोळी, कार्याध्यक्ष यज्ञेश पाटील, ग्रुप ऑफ युथ मुव्हमेंटच्या सहसचिव तनुश्री सुतार, प्रतिक पाटील, संदीप पाटील, राष्ट्रीय युवा स्वयंसेवक मंगला पवार, कार्यालयीन कर्मचारी वंदना पतंगे उपस्थित होते. 'कॅच द रेन' या उपक्रमांतर्गत डिसेंबर २०२१ ते मे २०२२ या कालावधीत परिसंवाद, मार्गदर्शन, स्पर्धा अशा विविध माध्यमांद्वारे जनजागृती करण्यात आली आहे. यापैकी स्पर्धात्मक टप्प्यात आयोजित खुलागट निबंध स्पर्धेत जिल्ह्यातून एकूण ४७ निबंध प्राप्त झाले. यामध्ये पेण तालुक्यातील देविदास म्हात्रे द्वितीय, अलिबाग तालुक्यातील राजेंद्र पाटील तृतीय, मुरूडच्या हर्षली नागावकर आणि अलिबागच्या विक्रांती ठाकूर यांनी उत्तेजनार्थ बक्षीस पटकावले. सर्व विजेत्यांना प्रमाणपत्र, स्मृतिचिन्ह तथा भेटवस्तूचे तर अन्य स्पर्धकांना सहभाग प्रमाणपत्राचे वितरण करण्यात आले आहे. स्पर्धेसाठी जेएसएम महाविद्यालयाचे भाषा प्रा. जयेश म्हात्रे आणि सुरभी वाणी यांचे परीक्षण सहाय्य लाभले.

# पितृपक्षात भाज्यांचे दर वधारले

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

गौरी-गणपतीनंतर पितृपंधरवड्यात भाज्यांचे दर कमी होतील, अशी अपेक्षा असतानाच त्यावर पावसाने पाणी फेरले आहे. गेल्या आठवडाभरापासून होणाऱ्या पावसामुळे मुख्य बाजारपेठेत भाज्यांची आवक घटली आहे. मागणीपेक्षा आवक कमी असल्यामुळे भाज्यांचे भाव वधारले आहेत. विशेषत: पितृपक्षात वाडीमध्ये आवर्जून ठेवण्यात येणाऱ्या कारले, गवार, लाल भोपळा, अळूची पाने आदी भाज्यांचे भाव पाच ते २० टक्क्यांनी वाढले आहेत.

श्रावण, त्यानंतर अनंत चतुर्दशीपर्यंत पाळला जाणारा शाकाहार आणि त्यापाठोपाठ आलेला पितृपक्ष अशा ऐन सणांच्या काळात भाज्यांना वाढती मागणी आहे, पण गेल्या आठवड्यापासून अचानक कोसळणाऱ्या पावसामुळे भाज्यांची आवक घटली आहे. पितृपक्षात साधारणत: कारली, फ्लॉवर, भेंडी, गवार, लाल भोपळा, अळूची पाने, कोथिंबिर आदी भाज्यांना मागणी असली, तरी त्याची आवक मुबलक प्रमाणात नाही. त्यामुळे दर वधारल्याचे व्यापाऱ्यांनी सांगितले.

कृषी उत्पन्न बाजारातून घाऊक व किरकोळ व्यापारी भाज्या उचलतात. या भाज्या आपापल्या परिसरात विक्रीसाठी ठेवताना त्याच्या भावामध्ये दुप्पटीने वाढ झालेली असते. बाजारपेठेत २० ते २५ रुपये किलो भेंडी ७० रुपयांनी, तर किरकोळ व्यापाऱ्यांकडे १०० रुपये किलोने विकली जात आहे. फ्लॉवर चक्क १२० रुपये किलोने विकला जात आहे. कारली ८० रुपये किलो, वांगी ८० रुपये किलो, गावठी काकडी १०० रुपये किलो, लाल भोपळा ८० रुपये किलोने विकला जात आहे. पालेभाज्याही २० ते ३० रुपये जुडी अशी मिळत आहे. वडीसाठी लागणारी अळूची पाने २० रुपयांना चार ते पाच या भावात मिळत आहेत.

**अवकाळी पावसाने भाव वधारला असला तरी पितृपक्ष सुरू होणार असून त्यात भाज्यांना चांगला भाव मिळेल, अशी अपेक्षा आहे.**
**-इस्माईल बागवान, व्यापारी, कृषी उत्पन्न बाजार समिती**

पान १ वरून

## भाजपतर्फे सेवा पंधरवडा; विविध उपक्रम

त्याचे प्रत्येक बूथवर प्रक्षेपण करून विचारांचा लाभ घ्यावा, राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंतीनिमित्त आरोग्य केंद्र परिसर, उद्यान, शालेय परिसरात स्वच्छता अभियान राबविणे तसेच त्याच दिवशी माजी पंतप्रधान लालबहाद्दूर शास्त्री यांचीही जयंती असून त्या संदर्भातही कार्यक्रम राबविणे, अमृत सरोवर अंतर्गत तालुक्यातील तलाव स्वच्छ करणे व प्लॅस्टिकमुक्ती जनजागृती, जल ही जीवन मंत्र घेऊन जनजागृती रॅली, प्रत्येक शक्तीकेंद्रावर वृक्षारोपण तसेच खादी उपक्रमांतर्गत प्रत्येक पदाधिकारी व कार्यकर्त्याने खादीच्या वस्तू खरेदी करणे असे विविध कार्यक्रम या सेवा पंधरवड्यात असल्याचे विजया रहाटकर यांनी सांगत मार्गदर्शक सूचना केल्या आणि हा पंधरवडा जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली रायगड जिल्हा यशस्वी करेल, असा विश्वासही व्यक्त केला.

या वेळी आमदार महेश बालदी यांनी रायगड जिल्हा भाजपच्या वतीने वर्षभर सातत्याने सेवा उपक्रम आयोजित करून त्याचा लाभ सर्वांना मिळवून देत असल्याचे सांगतानाच सेवा पंधरवडा मागीलप्रमाणे या वेळीही यशस्वी करण्यासाठी नियोजनबद्ध आयोजन करणार असल्याचे सांगितले. या बैठकीचे प्रास्ताविक जिल्हा संघटन सरचिटणीस अविनाश कोळी यांनी केले, तर आभार दीपक बेहेरे यांनी मानले.

## दुखवटा

### राजाराम ठाकूर

**उरण** : पाणदिवे येथील वेल्डिंग वर्क्सचे मालक तथा सामाजिक कार्यकर्ते राजाराम चंद्रकांत ठाकूर यांचे शनिवारी (दि. १०) हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले.



मृत्यूसमयी त्यांचे वय ७४ वर्षे होते. पत्नीच्या निधनानंतर कुटुंबाचा संपूर्ण आधार बनलेल्या राजाराम ठाकूर यांनी गावी स्वत:चा वेल्डिंग व्यवसाय सुरू करून आपले कुटुंब सावरले. त्यांच्या पश्चात दोन मुले, एक मुलगी आणि नातवंडे असा परिवार आहे. त्यांचा दशक्रिया विधी सोमवारी (दि. १९) क्षेत्र माणकेश्वर येथे तर उत्तरकार्य विधी गुरुवारी (दि. २२) राहत्या घरी पाणदिवे येथे होणार असल्याची तसेच कोणत्याही प्रकारचे दुखवटे स्वीकारले जाणार नसल्याची माहिती त्यांचे चिरंजीव संदेश आणि अजित ठाकूर यांनी दिली आहे.

### रामुबाई म्हात्रे

**उरण** : सोनारी गावातील रामुबाई पांडुरंग म्हात्रे यांचे शनिवारी (दि. १०) अकस्मात निधन झाले. मृत्यूसमयी त्यांचे वय ७५ वर्षे होते. त्यांच्या पश्चात मोठा म्हात्रे परिवार



आहे. रामुबाई म्हात्रे यांचा स्वभाव प्रेमळ असल्याने त्यांचा जनसंपर्क मोठा होता. त्यांच्या अंत्ययात्रेत मोठा जनसमुदाय उपस्थित होता. त्यांचा दशक्रिया विधी सोमवारी (दि. १९) सकाळी श्री क्षेत्र माणकेश्वर येथे होणार असून दिवसकार्य मंगळवारी (दि. २०) राहत्या घरी सोनारी येथे होणार आहे.





पनवेल भाजपतर्फे
जनहितार्थ
माहितीसाठी

पनवेल महानगरपालिका हद्दीत
सोमवार, दि. १२ सप्टेंबर २०२२ रोजी होणारे
कोरोना प्रतिबंधक लसीकरण
(सर्व केंद्रांवर ऑनलाइन व ऑफलाइन लसीकरण होईल)
कोविशिल्ड कोव्हॅक्सिन कार्बेव्हॅक्स
सर्व केंद्रांवर (वयोगट : १२ वर्षांवरील सर्व नागरिकांसाठी)
- १. यूपीएचसी-१, गावदेवी पाडा, पनवेल
- २. रोटरी क्लब, से. १९, नवीन पनवेल
- ३. यूपीएचसी-४, सिडको समाज मंदिर, कळंबोली
- ४. यूपीएचसी-५, डी-मार्टच्या मागे, सेक्टर १५, खारघर
- ५. यूपीएचसी-६, सुषमा पाटील विद्यालय, कामोठे
- ६. उपजिल्हा रुग्णालय, पनवेल

Pricautionary dose हे फक्त दुसरा डोस घेऊन नऊ महिने पूर्ण झालेल्या HCW, FLW, व ६० वर्षांवरील Comorbid व्यक्तिंचेच लसीकरण केले जाईल याची नोंद घ्यावी.

# केळवणेत विकासकामांचा शुभारंभ

## भाजप नेते ज्ञानेश्वर घरत यांच्या हस्ते भूमिपूजन

## आमदार महेश बालदींच्या प्रयत्नाने उरण मतदारसंघाचा चेहरामोहरा बदलतोय

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुक्यात व उरण विधानसभा मतदारसंघात येणाऱ्या केळवणे या ठिकाणी विविध विकासकामांचे भूमिपूजन रविवारी (दि. ११) जिल्हा परिषद सदस्य ज्ञानेश्वर घरत यांच्या हस्ते झाले.

पनवेल आणि उरण तालुक्यात भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर आणि आमदार महेश बालदी यांच्या प्रयत्नांमुळे विकासाची गंगा वाहत आहे. त्या अंतर्गत उरण मतदार संघात आमदार महेश बालदी व जिल्हा परिषद सदस्य ज्ञानेश्वर घरत यांच्या प्रयत्नाने केळवणे शाळा वर्गखोली बांधणे, व मारीआई मंदीर शेड तयार करणे या दोन कामांचे भूमिपूजन झाले.



या कार्यक्रमांच्या वेळी सरपंच अश्विनी घरत, उपसरपंच शर्मिला माळी, माजी उपसरपंच भानुदास गावंड, माजी उपसरपंच उज्वला ठाकूर, ग्रामपंचायत सदस्य सुशील ठाकूर, ग. बा. पाटील, भरत घरत, तुकाराम पाटील, सखाराम पाटील, हरिश्चंद्र पाटील, आत्माराम माळी, जगन्नाथ म्हात्रे, रामचंद्र शिवकर, धनाजी म्हात्रे, पांडुरंग पाटील, हिराजी म्हात्रे, अशोक थळी, वसंत पाटील, मधुकर पाटील, प्रभाकर ठाकूर, रमेश ठाकूर, प्रदीप पाटील, शशिकांत कोळी, महादेव म्हात्रे, भरत ठाकूर, निलेश पाटील, प्रमोद पाटील, संजय पाटील, रामचंद्र मोकल, भारत ठाकूर, हरिश्चंद्र माळी, अमोल पाटील, निलेश शेडगे, धर्मेंद भोईर, सुरेश शिवकर, परमवीर शेडगे, प्रकाश ठाकूर, तेजस माळी, कृष्णा म्हात्रे, समीर ठाकूर, जितू गावंड, राजन घरत, संजय पाटील, योगेश घरत, राजेश घरत, विलास ठाकूर तसेच जुनिआळी ग्रामस्थ व गावातील असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते.

भारतीय जनता पक्षातर्फे पनवेल व उरण मतदार संघात विकासकामांचा झंझावात सुरू आहे. शहर आणि ग्रामीण अशा दोन्ही ठिकाणी नागरिकांना उत्तर सोयीसुविधा देण्यासाठी भारतीय जनता पक्षाचे नगरसेवक, पदाधिकारी, कार्यकर्ते मेहनत घेत असतात. त्यामुळे नागरिक वेळोवेळी आभार मानून या भाजपच्या या मेहनतीला कौतुकांची थाप देत असतात.

# गौरा गणेशोत्सवात विसर्जनासाठी रात्री उशिरापर्यंत परवानगी द्यावी

## अ‍ॅड. प्रथमेश सोमण यांची मुख्यमंत्र्यांकडे मागणी

**पनवेल : वार्ताहर**

गौरा गणेशोत्सवामध्ये विसर्जनासाठी रात्री बारा वाजेपर्यंत परवानगी देण्यात यावी, अशी मागणी पनवेल शिवसेना महानगरप्रमुख अ‍ॅड. प्रथमेश सोमण यांनी केली आहे. या संदर्भात त्यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना निवेदन दिले आहे.

रायगड जिल्ह्यात व विशेष करून पनवेलमध्ये गौरा गणपती (साखरचौथ गणपती) साजरा करण्याची विशेष परंपरा आहे. मुख्य गणेशोत्सवातील दहा दिवसांच्या गणपतीचे विसर्जन झाल्यानंतर पितृपंधरावड्यातील येणाऱ्या चतुर्थीला गणपतीची प्रतिष्ठापना करून दुसऱ्या दिवशी विसर्जन करण्याचा प्रघात आहे. ह्या उत्सवाची परंपरा पनवेलमध्ये वर्षानुवर्षे साजरी केली जात आहे. पनवेल मध्ये असा गणेशोत्सव साजरा करणाऱ्या नोंदणीकृत मंडळांची संख्या ७५ च्या वर असून अनेक नागरिक घराघरातदेखील या गणेशोत्सवाचे पालन करतात.

हा दीड दिवसाचा गणेशोत्सव यावर्षी मंगळवारी (दि. १३) साजरा होत असून बुधवारी (दि. १४) विसर्जन होणार आहे. सामान्यतः या विसर्जन मिरवणुकांना रात्री १० वाजेपर्यंत प्रथेप्रमाणे परवानगी असते, परंतु गेली दोन वर्षे कोविडमुळे ही परंपरा खंडित झाली आहे. मंडळांना उत्सव साजरे करता आले नाहीत. तथापि आता आपले हिंदुत्ववादी व लोकाभिमुख सरकार अस्तित्वात आले आहे म्हणूनच पनवेलच्या या अनोख्या परंपरेत गणेश विसर्जनाची मर्यादा रात्री बारा वाजेपर्यंत वाढवण्यात यावी अशी मागणी पनवेलकर नागरिक गणेश भक्त व शेकडो मंडळाच्या प्रतिनिधीमार्फत मी आपणास करीत आहे.

मावळचे संसदरत्न खासदार श्रीरंग आप्पा बारणे यांनाही ही मागणी केली असून याबाबतीत योग्य तो पाठपुरावा करण्याचे आश्वासन त्यांनी दिले आहे. कृपया संबंधित जिल्हाधिकारी व पोलीस आयुक्त यांना योग्य ते आदेश पारित करावेत ही विनंती, असे सोमण यांनी निवेदनात नमुद केले आहे.

# रॅगिंग करणाऱ्या चार विद्यार्थ्यांवर गुन्हा दाखल

**पनवेल : वार्ताहर**

कामोठे येथील एमजीएम दंत महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या एका विद्यार्थ्याचे त्याच महाविद्यालयातील चार विद्यार्थ्यांनी रॅगिंग केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे.

या तक्रारीनुसार पोलिसांनी या चार विद्यार्थ्यांविरोधात महाराष्ट्र छळवाद प्रतिबंध अधिनियम १९९४ (४) नुसार गुन्हा दाखल करून या प्रकरणाच्या तपासाला सुरुवात केली आहे. या प्रकरणात रॅगिंग झालेला विद्यार्थी महाविद्यालयात हॉस्टेलमध्ये राहतो. त्याच महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या चार विद्यार्थ्यांनी ऑगस्टमध्ये या विद्यार्थ्याचे रॅगिंग केले होते. या प्रकारामुळे मानसिक तणावाखाली आलेल्या या विद्यार्थ्याने पालकांना या प्रकाराची माहिती दिल्यानंतर त्याच्या आईने महाविद्यालयातील अँटी रॅगिंग कमिटीकडे तक्रार केली. तसेच, माझ्या मुलास पॅनिक अटॅक येत असल्याचेही त्यांनी सांगितले होते. या कमिटीने रॅगिंग झालेल्या विद्यार्थ्यांची चौकशी करून त्याच्याकडून रॅगिंगसंदर्भात माहिती घेतली होती. त्यानंतर रॅगिंग करणाऱ्या दोन्ही विद्यार्थ्यांची त्यांच्या पालकांसमोर चौकशी केली होती.

या दोन्ही विद्यार्थ्यांनी या विद्यार्थ्याचे रॅगिंग केल्याचे आढळून आले. तसेच त्यावेळी त्या खोलीत असणाऱ्या इतर दोन विद्यार्थ्यांचादेखील या प्रकरणात सहभाग असल्याचे आढळून आले. यानंतर या महाविद्यालयाने कामोठे पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली.

# रोट्रॅक्ट क्लब ऑफ पनवेलतर्फे गणेशभक्तांना मोफत पाणीवाटप

**पनवेल : वार्ताहर**

गणेश विसर्जनासाठी आलेल्या गणेशभक्तांना दरवर्षीप्रमाणे यंदाही रोट्रॅक्ट क्लब ऑफ पनवेलतर्फे मोफत पाणीवाटप हा उपक्रम राबविण्यात आला होता. त्याला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

गेली दोन वर्षे कोरोना या भयानक साथीने जगात काय पूर्ण देशात व परदेशात थैमान घातले होते. दोन वर्षे कुठल्याही प्रकारचे सण व उत्सव, लग्न समारंभ थाटात करता आले नाही, परंतु नवीन सरकारने सर्व सण जोरात सुरू करा असे सांगितल्यावर सर्व जण आपल्या लाडक्या गणपती बाप्पाची तयार करण्यात मग्न होते.

रोट्रॅक्ट क्लब ऑफ पनवेलचे अध्यक्ष अ‍ॅड. अक्षय निजापूकर, सचिव शरद जाधव आणि कम्युनिटी सर्व्हिस डायरेक्ट डॉ. दामिनी खुणेपिंपरे यांच्या नियोजनाखाली रोट्रॅक्ट क्लबच्या सभासदांनी सालाबादप्रमाणे या वर्षी ही येणाऱ्या सर्व गणेशभक्तांना मोफत पाणी वाटपाचा कार्यक्रम विरूपाक्ष महादेव मंदिर, शिवाजी रोड, रीची रीच दुकानापाशी आयोजित केला होता. त्याला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.







पनवेल : भाजप ओबीसी सेल उत्तर रायगड जिल्हा सरचिटणीस दशरथ म्हात्रे यांच्या आसूडगाव येथील घरी व खिडूकपाडा येथे भाजप कार्यकर्ते शंखुनाथ भोईर यांच्या घरी विराजमान गणरायाचे भाजप तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी दर्शन घेतले. या वेळी जि. प. सदस्य अमित जाधव, पं. स. सदस्य भूपेंद्र पाटील तसेच बबन म्हात्रे, मनोहर म्हात्रे, प्रतिक म्हात्रे आदी उपस्थित होते.

# गरजूंना भांडीवाटप

**पनवेल : गुळसुंदे ग्रुप ग्रामपंचायत कार्यालयात गुळसुंदे, आकुळवाडी, लाडीवली येथील पाच आदिवासीवाड्या व एक बौद्धवाडी यांना १५ टक्के अनुदानातून मागासवर्गीयांना भांडी वाटप करण्यात आले. सरपंच हरिश्चंद्र लक्ष्मण बांडे, उपसरपंच शांताराम रघुनाथ मालुसरे, ग्रामविकास अधिकारी रामदास बाबाजी दासगावकर तसेच ग्रामपंचायत सदस्य यांच्या हस्ते १५ टक्के अनुदानातून सार्वजनिक लाभापोटी जेवणाची मोठी भांडी, खुर्ची, शेगड्या, स्पिकर सेट वाटप करण्यात आले. त्याबद्दल सर्वांनी ग्रामपंचायतीचे कौतुक केले.**



# तुराडे ग्रामपंचायतीतर्फे मखर आरास स्पर्धा; भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

गणेशोत्सवानिमित्त ३१ ऑगस्ट ते ९ सप्टेंबर या कालावधीत तुराडे ग्रामपंचायतीच्या वतीने मखर आरास स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेला गावातील नागरिकांचा भरघोस प्रतिसाद मिळाला.



तुराडे ग्रामपंचायतीच्या वतीने सरपंच चंद्रकांत भोईर, उपसरपंच भाऊ ठाकूर, माजी उपसरपंच मनोहर चव्हाण, विश्वनाथ गायकवाड, हर्षल पाठारे यांनी संपूर्ण तुराडे गाव आणि कष्टाकरीनगर येथील गणपतींचे दर्शन व पाहणी करून पर्यावरणपूरक मखर, शुशोभीकरण, स्वच्छता आरास सोबतच स्वच्छ परिसर व सांस्कृतिक वारसा आपल्याकडून या कालावधीत मोठ्या प्रमाणात जपला गेला. या सर्वांचे निकष काढून नंबर काढण्यात आले. त्यामुळे यावर्षी थर्माकोलचा वापर नगण्य होता.

सर्वांचे मखर आरास अतिशय सुरेख होती. ग्रामपंचायत तुराडेकडून सहभागी स्पर्धकांचे आभार व्यक्त करण्यात आले. पंच कमिटीने या स्पर्धेचे पहिले तीन क्रमांक निवडलेले आहेत. यामध्ये प्रथम क्रमांक सतीश लक्ष्मण ठाकूर, द्वितीय क्रमांक जितू सुरेश दळवी, तृतीय क्रमांक रघुपती पाटील असे आहेत.

विजेत्यांचे अभिनंदन करून ग्रामपंचायतीकडून आकर्षक बक्षीस व प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात येईल. तसेच तुराडे कष्टकरी नगरमधील सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ कष्टकरी नगर,जय हनुमान सामाजिक विकास मंडळ कष्टकरी नगर व जय दुर्गा माता विकास मंडळ कष्टकरी नगर यांच्याकडून सार्वजनिक गणेशोत्सव साजरा केला गेला. गणेशोत्सवासोबतच या मंडळांनी रक्तदान शिबिर व इतर सामाजिक उपक्रम राबविल्यामुळे तुराडे ग्रामपंचायतीकडून या मंडळांना आकर्षक ट्रॉफी व प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.

## अर्थसाक्षर स्पर्धा : ३५

### निकाल पुढीलप्रमाणे

१. येत्या ३० सप्टेंबर २२ पासून कोणत्या कंपनीचा निफ्टी ५० मध्ये समावेश होणार आहे?
ई. अदानी इंटरप्रायजेस

२. पुढीलपैकी कोणत्या देशाचा पहिल्या पाच अर्थव्यवस्थेमध्ये समावेश होत नाही?
इ. फ्रान्स

३. ऑगस्ट २२ मध्ये जीएसटीचे एकूण संकलन किती झाले आहे?
अ. १.४४ लाख कोटी रुपये

**अर्थसाक्षर स्पर्धा ३५या प्रश्नांना एकाही स्पर्धकाने बरोबर उत्तर दिलेले नाही. त्यामुळे अर्थसाक्षर स्पर्धा ३५साठी एकही विजेता नाही.**

राम प्रहर

## अर्थसाक्षर स्पर्धा : ३६

**अर्थसाक्षर स्पर्धेचे तीन प्रश्न खाली दिले आहेत.**

**वाचक स्पर्धकांनी निवडलेली बरोबर उत्तरे पुढील पाच दिवसांत म्हणजेच गुरुवारी रात्री ८ वाजेपर्यंत ‘राम प्रहर’च्या ७७३८१०६००९ या मोबाईल क्रमांकावर कळवावी (व्हॉट्सअ‍ॅप, मेसेज अथवा malharnetwork2022@gmail.com यावर मेल केले तरी चालेल).**

**१. शेअर बाजारात गुंतवणूक करण्यासाठी आवश्यक असलेल्या डीमॅट खात्यांची संख्या भारतात सध्या एवढी झाली आहे?**
***अ.*** ४.३ कोटी ***आ.*** ५.५ कोटी ***इ.*** १० कोटी ***ई.*** ७.४ कोटी

**२. मोबाईल सेवा पुरविणारी भारतातील सर्वात मोठी कंपनी कोणती आहे?**
***अ.*** जिओ ***आ.*** भारती एअरटेल
***इ.*** व्होडाफोन आयडिया ***ई.*** टाटा टेलिकम्युनिकेशन

**३. भारतीय शेअर बाजारात सर्वाधिक बाजारमूल्य असलेली बँक कोणती?**
***अ.*** एचडीएफसी बँक ***आ.*** आयसीआयसीआय बँक
***इ.*** कोटक महिंद्रा बँक ***ई.*** स्टेट बँक ऑफ इंडिया

Save More - Get Pure
E-store India
India's Widest SWADESHI Supermarket
India's Next Retail Revolution
BEST PRICE SUPERMARKET
ASSURED MINIMUM 4% OFF ON ALL PRODUCTS
UPTO 33% OFF
Sai Sarang Co-op Society, Shop No.1&2, Momin Pada, Tapal Naka,Old Panvel, Pin - 410 206.

**टीप :** वरील तीनही प्रश्नांची अचूक उत्तरे देणाऱ्या वाचकांमधून पहिल्या तीन क्रमांकांची निवड संगणक प्रणालीने करण्यात येईल. या तीनही विजयी वाचकांना पनवेल, टपाल नाका येथील ‘ई-स्टोर इंडिया’तर्फे गिफ्ट व्हाऊचर्स देण्यात येतील, तसेच सर्व विजयी वाचक स्पर्धकांची नावे पुढील रविवारी अर्थ प्रहर सदरात जाहीर करण्यात येतील.

**...तर मग चला लागा तयारीला आणि अर्थसाक्षर स्पर्धेत यशस्वी व्हा!**

# पनवेलच्या वडाळे तलावात स्थलांतरित पक्ष्यांची रेलचेल

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेलमधील बल्लाळेश्वर मंदिरजवळील वडाळे तलावात सध्या स्थलांतरित पक्ष्यांची रेलचेल आहे. मुबलक प्रमाणात अन्न उपलब्ध असल्यामुळे विविध पक्ष्यांच्या संख्येत वाढ झाल्याने पक्षीप्रेमींमध्ये आनंदाचे वातावरण आहे.

पनवेल शहरातील वडाळे तलावाला इतिहास आहे. शहराच्या सौंदर्यात भर घालणाऱ्या या तलावात विविध प्रकारच्या पाण वनस्पती आहेत. या वनस्पतींची हिरवी शाल या तलावाच्या पात्रावर पसरलेली असून येथे उगवणारे कमळही आकर्षणाचे केंद्र आहेत. पूर्वी या तलावात १००पेक्षा अधिक जातींचे पक्षी निदर्शनास येत होते. गेल्या काही वर्षांत वाढत्या प्रदूषणामुळे हे प्रमाण कमी झाले होते, पण आनंदाची बाब म्हणजे आता या तलावात पुन्हा स्थलांतरीत पक्ष्यांचा वावर वाढला आहे. मुबलक प्रमाणात उपलब्ध असलेले अन्न आणि विणीच्या हंगामामुळे सध्या वडाळे तलावात पाणकोंबड्यांसोबत इतर पक्ष्यांचा वावर आहे. महत्त्वाची बाब म्हणजे दहा वर्षांनंतर प्रथमच कमळ या स्थलांतरित पक्षीदेखील ढेरेदाखल झाल्याने पक्षीप्रेमींमध्ये आनंदाचे वातावरण आहे. त्याचबरोबर वारकरी अर्थात कॉमन कूट, नक्टा (कोम्ब डक) बदक, जांभळा बगळा, काणूक, हळदकुंकू, टिबुकली, रात्र बगळा यांचादेखील वावर असल्याने पक्षीप्रेमींसाठी पर्वणीच ठरत आहे.

नक्टा (कोम्ब डक) बदक या पक्षाने येथे संसार थाटला असून तलावातील जलपर्णीवर हा पक्षी तरंगते घरटे तयार करतो. या पक्ष्याचे वेगळेपण म्हणजे त्याच्या चोचीवर एक मांसल गाठ किंवा बोनडुक आहे. ही गाठ विणीच्या हंगामात मोठी होती. त्यामुळे हिवाळ्यात नर आणि मादीतील फरक पटकन ओळखता येते. याचबरोबर खारघरमधील खाडी किनाऱ्यावर ‘पॅसिफिक गोल्डन प्लोव्हर’ या पक्ष्यांचे आगमन झाल्याचे पक्षीतज्ज्ञ तारांग सरीन यांनी सांगितले.



**दहा वर्षांनंतर प्रथमच या तलावात विविध स्थलांतरित पक्षी निदर्शनास आले आहेत. या पक्ष्यांनी आपले वंश वाढविण्यासाठी तलावात तरंगती घरटी उभारली आहेत. विदेशी पक्षीही येथे आले आहेत. पूर्वीप्रमाणे या तलावात पक्ष्यांचा वावर असावा.**
**-सुदीप आठवले, पक्षीतज्ज्ञ, पनवेल**

**काही दिवसांत हिवाळा सुरू होणार आहे. त्यामुळे विदेशातील स्थलांतरित पक्षी खारघरमधील खाडीकिनारा हळूहळू येण्यास सुरुवात झाली आहे. त्यात विविध जातींचे बदक आहेत. पुढील महिन्यात मोठ्या प्रमाणात पक्षी खारघर खाडीत दिसून येतील.**
**-ज्योती नाडकर्णी, पक्षीप्रेमी, खारघर**



## संपादकीय

# गतिमान सरकार

शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील महाविकास आघाडी सरकारच्या काळात राज्यातील जनतेला 'सरकारी काम आणि सहा महिने थांब' या म्हणीचा पुरेपूर प्रत्यय येत होता. नवे सरकार या बाबतीत पूर्णतः भिन्न आहे. लोकाभिमुख, पारदर्शक आणि गतिमान पद्धतीने राज्यकारभार चालवून दाखवत शिंदे-फडणवीस सरकारने आपल्या कामाची चुणूक दाखविली आहे. राज्यातील हा बदल सुखावह आहे.

**आपला देश लोकशाहीप्रधान म्हणून ओळखला जातो. भारतीय लोकशाही प्रणालीची जगभर वाहवा होत असते. लोकशाहीत जनतेने दिलेला कौल शिरोधार्य मानून सत्ता स्थापन करून राज्यकारभार चालविणे अपेक्षित असते, मात्र भाजप-शिवसेना युतीला दिलेला कौल शिवसेनेने झुगारून लावत मुख्यमंत्रिपदाच्या असुरी महत्त्वाकांक्षेपोटी परस्परविरुद्ध विचारधारा आणि ध्येय-धोरणे असलेल्या राष्ट्रवादी काँग्रेस आणि काँग्रेसशी सलगी केली. याचा शेवट व्हायचा तोच झाला, पण या स्वार्थी, सत्तालोलुप तिघाडी सरकारच्या सुस्त, मदमस्त कारभाराचा फटका राज्यातील जनतेलाही बसला. स्वत: तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे आधी कोरोना आणि नंतर शस्त्रक्रियेचे कारण देऊन घरूनच गाडा हाकत होते. या काळात राज्यात बऱ्या-वाईट घटना घडल्या, मात्र हे मुख्यमंत्री महाशय ढीम्म हलले नाहीत. मंत्रालय, विधिमंडळ किंवा तत्सम शासकीय कार्यक्रम तर ते गृहित धरत होते, पण पक्षाकडे लक्ष द्यायलाही त्यांना वेळ नव्हता. त्यामुळे राज्यातील जनतेचे अक्षरश: हाल होत होते. त्यांची कामे होत नव्हती. विकास ठप्प होता. समस्या वाढत चालल्या होत्या, पण याचे तेव्हाच्या सरकारला सोयरसुतक नव्हते. अखेर शिवसेनेचे वरिष्ठ नेते एकनाथ शिंदे व सहकारी आमदारांनी उठाव करीत महाविकास आघाडी सरकारचे अन्यायकारी पाश तोडले आणि भाजपसोबत सरकार स्थापन करून सुशासन आणले. यानंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस या जोडीने कामाचा धडाका लावला आहे. दोन्ही नेते लोकांमध्ये वावरणारे, प्रत्यक्ष जागेवर जाऊन काम करणारे आहेत. या दोघांनीच मंत्रिमंडळ विस्तारापूर्वी अनेक निर्णय घेतले होते. मंत्रिमंडळ विस्तार, खातेवाटपानंतर सरकारच्या कामाचा वेग वाढलेला दिसतो. अर्थात, अद्याप राज्यमंत्र्यांची नियुक्ती व्हायची आहे. पालकमंत्रिपदेही निश्चित होणे बाकी आहेत. लवकरच त्याचीही पूर्तता होईल, परंतु ज्या एकजुटीने हे सरकार काम करीत आहे ते निश्चितपणे कौतुकास्पद आहे. याआधी एखादे संकट, आपत्ती आली की, नुसत्या घोषणा केल्या जायच्या. मदत काही नुकसानग्रस्तांपर्यंत पोहचत नव्हती. आता परिस्थिती बदलली आहे. शेतकरी, अतिवृष्टीबाधितांच्या नुकसानीचे वेळीच पंचनामे होऊन भरपाई अदा केली जात आहे. जनतेला त्यांच्या कामांसाठी मंत्रालयात येण्याची आवश्यकता भासू नये. स्थानिक पातळीवरच त्यांचा प्रश्न निकाली निघावा यासाठी कामकाज अधिक गतिमान करावे, असे निर्देश मुख्यमंत्र्यांनी प्रशासनाला दिले आहेत. याकामी मुख्यमंत्रीपद भूषविलेले व सध्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे बहुमोल मार्गदर्शन मुख्यमंत्री शिंदेंना मिळत आहे. आगामी काळात राज्यातील विविध घटकांसाठी चांगल्या योजना, निर्णय, उपक्रम राबविले जाण्याची चिन्हे आहेत. इच्छाशक्ती असेल तर कसे काम करता येते हे नव्या सरकारने दाखवून दिले आहे.**

# सुशासनातून निसर्गरम्य माथेरान कात टाकतेय..!





**खबरबात**
**संतोष पेरणे**

माथेरान पालिकेच्या लोकनियुक्त सदस्यांचा कार्यकाळ संपल्यानंतर माथेरान पालिकेचा कारभार पाहण्यासाठी शासनाने प्रशासकावर जबाबदारी दिली. राज्यात एका वेळी २००च्या जवळपास नगर परिषदांच्या मुदती संपत आल्याने सर्व ठिकाणी तहसीलदार दर्जाचा अधिकारी प्रशासक म्हणून देणे शकता नव्हते आणि म्हणून नगरविकास विभागाकडून त्या त्या ठिकाणी कार्यरत मुख्याधिकाऱ्यांनाच प्रशासक करण्यात आले. नुकतेच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी प्रशासन गतिमान करून सुशासन आणण्याचे निर्देश दिल्यानंतर, त्या अनुषंगाने माथेरानमध्ये विविध विकासकामे करण्यात येत आहेत. त्यामुळे माथेरानमध्ये खऱ्या अर्थाने सुशासन आले असल्याची भावना माथेरानकरांमधून व्यक्त होत आहे.

माथेरान पालिकेवर १ जानेवारी २०२२मध्ये प्रशासक म्हणून जबाबदारी घेतल्यानंतर मुख्याधिकारी असलेल्या सुरेखा भणगे यांनी शिस्तबद्ध पद्धतीने प्रशासन चालविण्यास सुरुवात केली. त्याचा परिणाम त्यांच्या कार्यपद्धतीबद्दल मंत्रालयात तक्रारी गेल्या, मात्र त्यावेळी माथेरानची राजकीय परिस्थिती वेगळी होती आणि स्थानिक लोकप्रतिनिधींचे पाठबळ भणगे यांच्या बाजूने असल्याने त्यांच्यावर अन्य कारवाई झाली नाही. आज परिस्थिती बदलली असून राज्यात शिंदे-फडणवीस सरकार आले आहे, मात्र ठाकरे सरकारमध्ये या खात्याचे निर्णय घेणारे तेच आहेत. आपल्या प्रशासक पदाच्या काळात सुरेखा भणगे यांनी गतिमान प्रशासनाच्या माध्यमातून माथेरानच्या जनतेवर पाडली आहे. त्यामुळे आता निवडणुका होईपर्यंत त्यांनी माथेरानमधील उर्वरित समस्याही मार्गी लावाव्यात, अशी अपेक्षा माथेरानकर करीत आहेत.

मुख्याधिकारी म्हणून ९ सप्टेंबर २०२१मध्ये माथेरान पालिकेची जबाबदारी स्वीकारल्यानंतर सर्वांत दिलासादायक बाब म्हणजे माथेरानमधील मुख्याधिकारी निवासस्थान उघडले गेले. त्यामुळे माथेरान २४ तासांत कसे असते आणि त्या ठिकाणी राहणारे कसे राहत असतील याचा अनुभव पालिका मुख्याधिकारी म्हणून आल्यावर भणगे यांनी घेतला.

अवघ्या चार महिन्यांनी पालिकेची सदस्य मंडळाचे कारकिर्द संपली आणि ओबीसी आरक्षण तसेच प्रभाग रचना अशा अनेक शासन निर्णयामुळे माथेरानसह राज्यातील नगरपालिका निवडणुका पुढे जात होत्या, त्यात माथेरानदेखील होते. जानेवारी महिन्यात प्रशासक पदाची जबाबदारी घेतल्यानंतर भणगे यांनी स्थानिकांचे प्रश्न सोडविण्यासाठी प्राधान्य देण्यास सुरुवात केली.

शहरात पालिका कर्मचाऱ्यांना शिस्त लावणाऱ्या मुख्याधिकारी भणगे यांनी प्रशासक पदाची जबाबदारी आल्यानंतर शहरातील नागरिकांचे कोणत्याही समस्या यांची अडवणूक होणार नाही याची खबरदारी घेतली होती. त्याचा परिणाम कामगार आणि कर्मचारी वर्ग वरून आदेश यायच्या आत ज्या कामांच्या तक्रारी असतील ती कामे पूर्ण करण्याचा प्रयत्न करायचे. प्रशासनावर विश्वास असल्याने कामगारदेखील प्रशासकांचे आदेश येण्याआधी खातेप्रमुखांच्या सूचनेसार कामे करून मोकळे व्हायचे. त्यात आपत्ती व्यवस्थापनची जबाबदारी यशस्वी करण्यासाठी प्रशासक असलेल्या मुख्याधिकारी यांनी सोशल मीडियावर एक ग्रुप तयार केला आणि त्या अडीचशे नागरिकांच्या ग्रुपमध्ये शहराच्या विकासासाठी संबंधित सर्वांना सामावून घेतले.

त्यानंतर कुठे झाड पडले, कुठे मातीचा रस्ता खचला, कुठे गटार भरून वाहतेय, तर कुठे सांडपाणी रस्त्यावर आले, कुठे रस्त्यावर दिवे बंद आहेत, तर कुठे रस्ते निसरडे झाले आहेत, कुठे भटक्या कुत्र्यांचा नागरिकांना त्रास होतोय, कुठे मोकाट जनावरे रस्त्यावर येऊन बसली आहे, नळाला पाणी नाही तर कुठे स्टँड पोस्ट तुटले आहेत, सार्वजनिक ठिकाणी गवत वाढलेय, नाक्यावर बंदी असलेले प्लास्टिक बॅनर दिसत आहेत, अशा अनेक समस्यांची जंत्री त्या सोशल मीडिया ग्रुपवर स्थानिकांकडून सुरू होती, मात्र मुख्याधिकाऱ्यांनी आपल्या सर्व सहकारी अधिकारी, कर्मचारी वर्गाला विश्वासात घेऊन त्यांच्यात विश्वास निर्माण करीत सर्व समस्या सोडविण्याचा प्रयत्न केला. माथेरानमध्ये पावसाळ्यात कोसळणारी झाडे ही मोठी समस्या आहे आणि त्या झाडांमुळे अश्वांना आपले प्राण गमवावे लागले आहेत. त्यामुळे पालिका प्रशासक असल्याने पोलीस प्रशासन आणि वनविभाग तसेच महावितरण या सर्व विभागात समन्वय साधून रस्त्याच्या दुतर्फा असलेली सर्व झाडांच्या फांद्या कापून त्या पावसाळ्यात खाली कोसळणार नाहीत याची काळजी घेतली. त्यानंतर पालिकेला पाणीपुरवठा करणाऱ्या शार्लोट लेक या तलावातील पाण्याची खाबाबदारी घेत सर्वत्र पावसाचा रेड अलर्ट आल्यानंतर सर्व विभाग यांच्याशी समन्वय साधून शार्लोट लेकच्या सुरक्षेची काळजी घेण्यात आली. अतिवृष्टीच्या काळात माथेरानमध्ये अनेक ठिकाणी वीज वितरणाचा प्रश्न समोर आल्यानंतर महावितरण विभागाला सर्वतोपरी सहकार्य करण्याचे काम प्रशासक म्हणून सुरेखा भणगे यांनी केले. त्याचवेळी शहरातील रस्ते खोदण्याचे काम जीवन प्राधिकरणकडून करण्यात येत असताना रस्त्यावर पडणारे खड्डे यावरदेखील ठोस भूमिका घेतली.

शहरातील नागरिकांची कामे एका चुटकीसरशी मार्गी लागत असल्याने प्रशासक यांच्या कामाबद्दल आणि त्यांच्याकडून चालविण्यात येत असलेल्या प्रशासनाबद्दल नागरिक समाधानी आहेत. त्यामुळे आपण निवडून दिलेल्या नगरसेवकांकडून त्या नागरिकांना ही सर्व कामे अपेक्षित असतात आणि ती कामे पालिकेच्या सोशल मीडिया ग्रुपवर माहिती दिल्यानंतर लगेच सुटतात, हा विश्वास जनतेमध्ये माथेरान पालिकेच्या प्रशासनाने निर्माण केला आहे. त्याची तुलना कदाचित आगामी काळात होणाऱ्या पालिका निवडणुकीच्या निमित्ताने होऊ शकते.

आपण निवडून दिलेले प्रस्थापित पक्षांचे नगरसेवक आपल्या समस्या सोडविण्यास असमर्थ ठरत असून तिच कामे पालिका प्रशासन अगदी दुसऱ्याच दिवशी करते ही भावना आता निर्माण होऊ शकते आणि त्यामुळेच प्रशासन सुशासन अनुभव माथेरानकर घेत आहेत. त्यात कामगार वर्ग देखील आपल्या वरिष्ठांचे आदेश झोकून देऊन कामे करताना दिसतात. त्यामुळे की काय त्यांचे कायमस्वरूपी होण्याचे अनेक वर्षे रखडलेले प्रस्ताव प्रशासक काळात निकाली निघाले आहेत. काही मुद्दा असला तरी कामगार वर्ग शहराच्या विकासात हातभार लावताना आणि आपले १०० टक्के योगदान देत दिसत आहे. याबद्दल समाधान जनतेतून व्यक्त होत आहे.

शहरात राहणारा आणि कोणत्याही क्षणी कार्यालयात उपलब्ध होणारा मुख्याधिकारी माथेरानच्या जनतेने कधी पाहिलेला नाही. काही मुख्याधिकारी तर सेवेतून निवृत्त व्हायचे आहेत म्हणून माथेरानमध्ये काही विशेष काही काम नाही म्हणून माथेरान पालिकेकडे येतात, तर अनेक अधिकारी आठवडा आठवडाभर शहराकडे फिरकत नव्हते, असे मुख्याधिकारी देखील या शहरातील जनतेने पहिले आहेत. शिकण्याची इच्छा असलेल्या मुख्याधिकारी माथेरानमध्ये येऊन राहतात आणि या गावाला स्वतःचे गाव मानून काम करतात ही भावना सुरेखा भणगे यांच्याबाबत जनतेत निर्माण झालेली आहे. शिंदे-फडणवीस सरकारचे सहकार्यदेखील त्यांना मिळत आहे. त्यामुळे आता माथेरानमधील उर्वरित समस्यादेखील लवकरच मार्गी लागतील, अशी भावना नागरिकांमधून व्यक्त होत आहे.

## बदलते तंत्रज्ञान



## आता व्हीआयपी मोबाइल नंबरही मिळणार फ्री

सध्याच्या धावत्या आणि ऐशोआरामाच्या जमान्यात लोक व्हीआयपी राहणीमानावर भर देतात. गाडी, कपडे, मोबाइल या वस्तू तर त्यांना ब्रॅन्डेड लागतातच, पण त्याचबरोबर गाड्यांचे आणि मोबाइलचे नंबरही लोकांना व्हीआयपी हवे असतात. व्हीआयपी नंबरसाठी भरमसाठ पैसे मोजावे लागतात. काही वेळा तर या नंबरचा लिलावही करण्यात येतो, मात्र आता दोन मोबाईल कंपन्या व्हीआयपी नंबर फ्रीमध्ये देणार आहेत.

व्हीआयपी नंबर हे इतर कॉमन नंबरसारखे नसतात. एका नजरेत ते पाठ होण्यासारखे असतात. त्यामुळेच त्यांना जास्त मागणी आहे. भारतातील बीएसएनएल आणि वोडाफोन -आयडीया म्हणजेच वीआय या दोन कंपन्यांनी व्हीआयपी मोबाइल नंबरसाठी नवीन ऑफर सुरू केली आहे. हे नंबर फ्रीमध्ये कसे मिळवायचे हे पाहूयात...

**व्हाआयपी मोबाइल नंबर कसा मिळवायचा?**

-कंपनीच्या अधिकृत वेबसाइटला भेट द्यावी लागेल. येथे तुम्हाला न्यू कनेक्शन कॅटेगिरी मिळेल.

-या ऑप्शनमध्ये फॅन्सी नंबर कॅटेगिरीवर क्लिक करा. आता एक नवीन पेज ओपन होईल. तिथे तुम्हाला प्रीपेड कनेक्शन हवे आहे की, पोस्टपेड हे सिलेक्ट करा.

-यानंतर तुमचा पिनकोड आणि मोबाइल नंबर टाका. आता तुम्हाला हवा असलेला व्हीआयपी नंबर शोधा. तुम्ही वीआयच्या फ्री लिस्टमधून कोणताही नंबर निवडू शकता.

-फ्री आणि प्रीमियम यामधील एक नंबर निवडा. प्रीमियम नंबरसाठी तुम्हाला ५०० रुपये द्यावे लागतील.

-फ्रीमधील कोणताही नंबर तुम्ही निवडू शकता. नंबर सिलेक्ट केल्यावर तुमचा पत्ता टाका. पेमेंट केल्यानंतर, सिमकार्ड तुमच्या घरी येईल.

भारतातील बीएसएनएल आणि वोडाफोन -आयडीया म्हणजेच वीआय या दोन कंपन्यांनी व्हीआयपी मोबाइल नंबरसाठी नवीन ऑफर सुरू केली आहे.

# रामभाऊ कुंदगोळकर उर्फ सवाई गंधर्व

**निमित्त**

**रामभाऊ कुंदगोळकर म्हणजेच सवाई गंधर्व हे हिंदुस्थानी शास्त्रीय संगीत गाणारे गायक हे गंधर्व परंपरेतील एक गायक होते. त्यांचा जन्म १९ जानेवारी १८८६ साली झाला, तर १२ सप्टेंबर १९५२ त्यांचे निधन झाले. आज त्यांच्या पुण्यस्मरणानिमित्त त्यांच्या कारकीर्दीचा घेतलेला धांडोळा...**



रामभाऊंच्या कुटुंबात संगीताची विशेष पार्श्वभूमी नसताना त्यांनी संगीतामध्ये रुची वाढविली आणि उस्ताद अब्दुल करीम खान यांच्या मार्गदर्शनाखाली हिंदुस्थानी शास्त्रीय संगीताच्या अभ्यासाला प्रारंभ केला. तेथील अभ्यास पूर्ण केल्यानंतर रामभाऊ एका नाटक कंपनीत सामील झाले आणि थोड्याच काळात मराठी रंगभूमीवर त्यांनी स्वतःचे स्थान निर्माण केले. नारायण श्रीपाद राजहंस यांना ज्याप्रमाणे लोक बालगंधर्व म्हणून ओळखू लागले, त्याचप्रमाणे रामभाऊ कुंदगोळकरांना लोक सवाई गंधर्व या नावाने ओळखू लागले.

किराणा घराण्याची परंपरा यशस्वीरित्या पुढे नेणाऱ्या आणि अधिकच उजळविणाऱ्या त्यांच्या शिष्यपरंपरेतील गायक/गायिकाच नव्हे तर संपूर्ण भारतीय शास्त्रीय संगीत क्षेत्र आज त्यांचे ऋणी आहे. सवाई गंधर्वांच्या शिष्यांपैकी काही नावे म्हणजे भीमसेन जोशी, बसवराज राजगुरू, गंगूबाई हनगळ, वगैरे. पंडित भीमसेन जोशी यांनी पुण्याला त्यांच्या गुरूंच्या स्मरणार्थ दरवर्षी होणारा सवाई गंधर्व संगीत महोत्सव सुरू केला. मास्तर कृष्णराव फुलंब्रीकर यांनी त्यांची सांगीतिक कारकीर्द नाट्यकला प्रवर्तक नाटक मंडळीत बालगायक-नट म्हणून सुरू केली होती. तिथे त्यांना काही काळ सवाई गंधर्वांकडून नाट्यसंगीताचे प्राथमिक मार्गदर्शन लाभले.

पुढे किराणा घराण्याचे प्रवर्तक अब्दुल करीमखाँ यांच्याकडे त्यांनी गायनाची कसून तालीम घेतली (१९००-१९०७). त्याचप्रमाणे निसार हुसेनखाँ, हैदरबक्ष, मुरादखाँ यांच्याकडून त्यांनी चिजांचे शिक्षण घेतले. १९०८मध्ये त्यांनी अमरावतीस नाट्यकला प्रवर्तक मंडळीत गायक-नट म्हणून प्रवेश केला व ते स्त्री भूमिका करू लागले. त्या काळात बालगंधर्व यांच्या स्त्रीभूमिका अत्यंत लोकप्रिय असतानाही, कुंदगोळकरांच्या रूपाने स्त्रीभूमिका करणारा एक नवा गायक-नट रंगभूमीवर अवतीर्ण झाला व अल्पावधीतच लोकप्रियतेच्या शिखरावर पोहचला. या लोकप्रियतेमुळेच वऱ्हाडाचे नबाब म्हणून प्रसिद्ध असलेले दादासाहेब खापर्डे यांनी अमरावती येथे १९०८साली त्यांना 'सवाई गंधर्व' ही पदवी दिली व या टोपण नावानेच ते पुढे जास्त ओळखले जाऊ लागले.

१९३२मध्ये त्यांनी नाट्यजीवनाला कायमचा रामराम ठोकला. १९३० नंतर संगीत रंगभूमीची सद्दी संपल्यावर सवाई गंधर्व शास्त्रीय संगीताच्या मैफलींकडे वळले. सवाई गंधर्वांचा आवाज मुळात गोड नव्हता, पण त्यांनी अथक परिश्रम करून आपला आवाज सुरेल बनविला. त्यांनी अधिक वैविध्य व गायकीत आक्रमकपणा आणून किराणा घराण्याची परंपरा अधिक समृद्ध केली. १९४२मध्ये त्यांना पक्षाघाताचा तीव्र झटका आला व परिणामत: पुढील दहा वर्षे त्यांचे गाणे पूर्णत: थांबले. पुणे येथे त्यांचे निधन झाले. सवाई गंधर्वांच्या मृत्यूनंतर त्यांच्या तैलचित्राचे अनावरण पुणे येथील भावे हायस्कूलमध्ये, तसेच पुणे येथील संभाजी उद्यानात अर्धपुतळ्याचे अनावरण ९ जून १९६४ रोजी आचार्य अत्रे यांच्या हस्ते करण्यात आले. सवाई गंधर्वांची पहिली पुण्यतिथी १९५३मध्ये 'आर्य संगीत प्रसारक मंडळा'तर्फे संगीताचा कार्यक्रम करून साजरी करण्यात आली. तेव्हापासून आजतागायत 'सवाई गंधर्व पुण्यतिथी संगीत महोत्सव' पुण्यामध्ये जोमाने साजरा केला जातो.

**साभार : मराठी विश्वकोश, विकीपिडीया**

**क्लिक...क्लिक...!**



**अलिबाग : रम्य सायंकाळी तळ्यातील शांत पाण्यात किनारी असलेल्या वृक्षाचे पडलेले अप्रतिम प्रतिबिंब.**

## आरोग्य प्रहर



## काळे मिरे अनेक आजारांवर रामबाण उपाय

मिरे हे जगातील सर्वांत जुने व फार महत्त्वाचे मसाल्याचे पीक आहे. चरकसंहिता, बृहत्संहिता व तमिळ वाङ्मयात त्याचे पुष्कळ उल्लेख आढळतात. इ. स. पाचव्या शतकात भारतातून ग्रीसला त्याची निर्यात होत असावी.

मसाल्यात वापरण्यात येणाऱ्यापैकी एक काळे मिरे आहे. काळे मिऱ्यात खूप औषधी गुणधर्मसुद्धा आहे. त्यामुळे याचा आरोग्यासाठी खूप उपयोग होतो. मसाल्यात तिखट म्हणून याचा वापर केला जातो.

भारतात मिरवेलीचे ७५पेक्षा अधिक प्रकार लागवडीत आहेत. केरळात कल्लुवल्ली, बालनकोट्टा, करिमुंडा आणि कोट्टानड हे जुन्या प्रकारांपैकी जास्त उत्पन्न देणारे प्रकार आहेत. हे काळे मिरे जगात सर्वत्र पिकत नाही, मात्र भारतात मोठ्या प्रमाणात पिकते. हे औषधी काळे मिरे अल्यामुळे जगभरातून याला मागणी आहे.

-डेंग्यू तापाला कारणीभूत ठरणाऱ्या डासावर काळ्या मिरीचा मारक परिणाम होतो.

-डासांची अंडी मिरीमुळे नष्ट होण्यास मदत होते.

-काळे मिरेची पावडर कर्करोग आणि पित्तविरोधी आहे.

-पित्तामुळे पोटात गुडगुड किंवा भगभग होत असल्यास मिरे खाल्ल्याने थांबते.

-मिऱ्याची पावडर पाण्याबरोबर घेतल्यास भूकही वाढते.

-काळ्या मिरीमध्ये पायपॅरीन नावाचा घटक असतो. आणि पायपॅरीनमध्ये ॲन्टीऑक्सिडंट गुणधर्म आहेत. या गुणधर्मामुळे व्यक्तीच्या प्रकृतीत प्रत्यक्ष अप्रत्यक्षपणे अनेक प्रकारच्या सुधारणा होऊ शकतात.

-काळे मिरे आणि वेलदोडा समप्रमाणात घेऊन भुकटी करून ती घेतल्यावर हगवणीवर गुणकारी ठकरे.

-दरम्यान, काळ्या मिरीवर संशोधन करण्यात येत आहे.

-पायपॅरीनवर कॅन्सर प्रतिबंधक औषध म्हणून संशोधन करण्यात येत आहे. पायपॅरीन हे शरीरातल्या काही कर्करोगांना कारणीभूत ठरणाऱ्या जंतूंचा नायनाट करु शकते. तसेच पायपॅरीन हे जनावरांनासुद्धा उपयुक्त असल्याचे दिसून आले आहे.

# चालक, वाहनासह २६ किलो गांजा पकडला

## गणेश विसर्जनाच्या रात्री नेरळ पोलिसांकडून कारवाई

**कर्जत : बातमीदार**

अनंत चतुर्दशी विसर्जन सोहळा पार पडल्यानंतर नेरळ पोलिसांकडून रात्रीची गस्त सुरु होती. पहाटे चार वाजण्याच्या सुमारास कल्याण आरटीओ परवाना असलेली एक इर्टिका गाडी आली. या वाहनाला गस्तीवर असलेल्या पोलिसांनी शिटी वाजवून थांबविण्याचा प्रयत्न केला. मात्र गाडी सुसाट वेगाने कर्जतकडे निघून गेली. गाडीचा पाठलाग करून पोलिसांनी ही गाडी थांबविली. गाडीत विक्रीसाठीचा तब्बल २६ किलो गांजा आढळून आला असून अंधाराचा फायदा घेवून यातील एकजण पळून गेला.

जप्त करण्यात आलेला एकूण ऐवज सव्वा तीन लाखाचा आहे. वाहन आणि चालक पोलिसांच्या हाती लागले असून मुख्य सूत्रधाराचा शोध सुरु आहे. त्याचा मोबाईल पोलिसांच्या हाती लागल्याने त्याच्यापर्यंत पोहचणे पोलिसांना शक्य होणार आहे.

याबाबत अधिक महिती अशी, अनंत चतुर्दशीचे विसर्जन झाल्यानंतर रात्रीची गस्त नेरळ पोलिसांकडून सुरु होती. मध्यरात्र उलटून गेल्यानंतर पहाटेच्या सुमारास कल्याणबाजूने एक इर्टिका गाडी कर्जतकडे जात होती. त्यावेळी नेरळ पोलिसांची व्हॅन गस्तसाठी कल्याण फाटा येथे थांबली होती. याचवेळी पोलिसांची गाडी बघून आणि आवाजदेवून देखील इर्टिका गाडी थांबली नाही म्हणून पोलिसांनी या वाहनाचा पाठलाग केला. त्यानंतर जुन्या एलएईएस शाळेच्या समोर पोलिसांनी या वाहनाला थांबविले. आवाज देवून का थांबला नाही असे प्रश्न पोलिसांनी विचारले असता गाडीचा चालक कोणत्याही प्रश्नाचे व्यवस्थित देवू शकला नाही. त्यामुळे गस्त पथक प्रमुख सहायक पोलीस निरीक्षक हनुमंत शिंदे तसेच पोलीस उपनिरीक्षक श्रीकांत काळे, धायगुडे, पोलीस कर्मचारी फरांदे, गिरी, पालवे चालक गर्जे यांनी वाहनाची



तपासणी करण्याचा निर्णय घेतला. वाहनात बिस्किटाचे बॉक्स दिसून आले. या बॉक्समध्ये काय आहे? असा प्रश्न केला. मात्र उत्तर मिळू शकले नाही.

दरम्यान, पोलिसांमुळे आपण पकडले जाणार या भीतीने वाहनातील एक व्यक्ती अंधाराचा फायदा घेवून तेथून पळून गेली. तर चालक पोलिसांच्या हाती लागला तसेच वाहनातून पळून जाणाऱ्या अनोळखी व्यक्तीचे दोन मोबाईलदेखील आढळून आले आहेत. पोलीस निरीक्षक प्रभारी अधिकारी राजेंद्र तेंडूलकर यांना याबाबत माहिती देण्यात आली.

सकाळ होताच पोलिसांनी पुन्हा रेल्वे स्टेशनपर्यंत जावून वाहन टाकून पळालेल्या व्यक्तीचा शोध घेण्याचा प्रयत्न केला. शेवटी ती अनोळखी व्यक्ती न सापडल्याने वाहन नेरळ पोलीस ठाणे येथे नेण्यात आले. नेरळ पोलिसांनी पोलीस ठाण्यात त्या वाहनामधून बिस्कीटाचे तेरा बॉक्स बाहेर काढून उघडले असता पोलिसांना धक्का बसला. या बॉक्समध्ये गांजाची पाकिटे होती आणि तो गांजा विक्रीसाठी बेकायदा वाहतूक केला जात होता. याबाबत नेरळ पोलिसांनी अमली पदार्थ यांची तस्करी करण्यासाठी वापरली जाणारे वाहन जप्त केले. पकडलेल्या गाजाचे वजन केले असता ते २६ किलो भरले. नेरळ पोलीस ठाण्यात गाडीचा चालक आणि अनोळखी व्यक्ती यांच्या विरूध्द अमली पदार्थ बाळगणे, हाताळणे तसेच बेकायदा वाहतूक करण्याचा गुन्हा दाखल केला आहे.

दरम्यान, नेरळ पोलिसांनी केलेल्या या कारवाई बद्दल त्यांचे कौतूक होत असून सहाय्यक पोलीस निरीक्षक शिंदे यांच्यासोबत गस्त पथकात पोलीस हवालदार हे पोलीस कर्मचारी होते. अधिक तपास पोलीस करत आहेत.

# नागोठणे पोलीस ठाण्यातील बाप्पाला भावपूर्ण निरोप

## निरीक्षक जगताप यांच्यासह कर्मचाऱ्यांचा सहभाग

**नागोठणे : प्रतिनिधी**

गणेशोत्सव उत्साहात साजरा व्हावा कायदा सुव्यवस्था सुरळीत राहावी यासाठी नागोठणे पोलीस प्रशासन दहा दिवस अहोरात्र सेवा देत असते. त्यामुळे पोलीस प्रशासनाच्या गणेशाचे विसर्जन हे अनंत चतुर्थीच्या दुसऱ्या दिवशी उत्साहात केले जाते. नागोठणे पोलीस ठाण्यात बसविण्यात आलेल्या गणरायाची मिरवणूक ढोल ताशा, बेंजोच्या गजरात नाचत गाजत काढून गणरायाला निरोप देण्यात आला. या वेळी पोलीस निरीक्षक राजन जगताप यांनीही वाद्याच्या तालावर ठेका धरला.

पोलीस कर्मचारी एकसमान वेशात सहभागी झाले होते. गणरायाचे आगमन ३१ ऑगस्ट रोजी घरोघरी झाले. गणेशोत्सव सण हा उत्साहात जिल्ह्यात साजरा व्हावा यासाठी पोलीस प्रशासन हे अहोरात्र काम करीत होते. नागोठणे पोलीस ठाण्यात ही गणेशोत्सव दरवर्षी उत्साहात साजरा केला जातो. नागोठणे



पोलीस ठाण्याचे हे ५१ वे वर्ष होते. जनतेच्या सेवेत २४ तास सेवा देणाऱ्या पोलिसांना गणरायाची सेवा करता यावी यासाठी नागोठणे पोलीस ठाण्यात दरवर्षी गणराय विराजमान केले जातात. घरोघरी तसेच सार्वजनिक गणेश मंडळांनी बसविलेल्या गणरायाचे दीड, गौरी गणपती, अनंत चतुर्थी दिवशी उत्साहात विसर्जन झाले. पोलीस हे गणेशोत्सव काळात बंदोबस्तासाठी असल्याने त्याचे गणरायाचे विसर्जन हे अनंत चतुर्थीच्या दुसऱ्या दिवशी उत्साहात केले जाते. दरम्यान, मिरवणुकीच्या वेळी पोलीस निरीक्षक राजन जगताप, उपनिरीक्षक नारायण चव्हाण यांच्यासह सर्व पोलीस कर्मचारी व त्यांचे कुटुंबीय पोलीस बॉईज संघटना, पत्रकार आणि नागरिक उपस्थित होते.

**वाजत गाजत मिरवणूक**

*या वर्षी बाप्पाचा उत्सव उत्साहात सर्वत्र झाला. गेले अकरा दिवस भक्त बाप्पाच्या भक्तीत तल्लीन होते. दरम्यान, नागोठणे पोलीस ठाण्यातील गणरायाची वाजत गाजत मिरवणूक काढण्यात आली होती. या वेळी पोलीस निरीक्षक राजन जगताप, कर्मचारी यांनी वाद्यावर ताल धरला होता. भक्तिमय वातावरणात पोलिसांनी गणरायाला निरोप दिला.*

# कर्जतमधील शेतकऱ्यांना शेतीविषयक मार्गदर्शन




**कर्जत : प्रतिनिधी**

युनायटेड वे मुंबई जल संजीवनी कर्जत प्रकल्प आणि कोवेस्ट्रो इंडिया प्रायव्हेट लिमिटेड कंपनी यांच्या संयुक्त विद्यमाने कर्जत तालुक्यातील खांडस ग्रामपंचायतीमधील डोंगरपाडा येथे शेतकऱ्यांना मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

हवामान बदलामुळे शेतीवर होणाऱ्या दुष्परिणामांना आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग करून सामोरे जाऊन शेतकऱ्यांचे राहणीमान उंचावणे आहे. शेतकऱ्यांना आधुनिक सिंचन पद्धतीची माहिती मिळावी, उन्हाळयात पाण्याचा कार्यक्षम वापर व्हावा जेणेकरून अतिरिक्त पिके घेता येईल, जमिनीची होणारी धूप टाळावी, पिकांचे उत्पादन वाढून शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढावे इच्छूक शेतकऱ्यांना कोवेस्ट्रो इंडिया प्रायव्हेट लिमिटेड कंपनीच्या सामाजिक बांधिलकी अंतर्गत तुषार सिंचन संच वाटप करण्यात येणार असून जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन युनायटेड वे मुंबईचे प्रकल्प व्यवस्थापक मुकेश देव यांनी केले.

या वेळी कोवेस्ट्रो सीएसआरटीमच्या प्रतिनिधींनी विविध शेतकऱ्यांच्या शेतावर प्रत्यक्ष भेटी देऊन शेतकऱ्यांशी संवाद साधून शेतकऱ्यांच्या समस्या प्रकर्षाने समजून घेतल्या. सभेस खांडस, बलीवरे, आंभेरपाडा, बेलाचीवाडी, नांदगाव, पाथरज येथील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते तसेच युनायटेड वे मुंबई जल संजीवनी, कर्जत प्रकल्पाचे प्रकल्प व्यवस्थापक प्रदीप क्षीरसागर, प्रकल्प उपव्यवस्थापक मुक्ताजी कांबळे आदी या वेळी उपस्थित होते.

# भरधाव ट्रक थेट घरात घुसला



**अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबाग तालुक्यातील खंडाळे नाका येथे चारचाकी वाहनाला वाचविण्याच्या प्रयत्नात भरधाव ट्रक थेट घरात घुसला. यात घराचे तसेच घराबाहेर उभ्या केलेल्या दुचाकीचे मोठे नुकसान झाले आहे. शनिवारी रात्री बारा वाजण्याच्या सुमारास हा अपघात झाला.

साळाव येथील ट्रक पेण-अलिबाग रस्त्यावरुन साळावच्या दिशेने जात होता. ट्रक खंडाळे नाका येथे आला असता समोरून येणाऱ्या एका चार चाकी वाहनाला वाचविण्याच्या प्रयत्नात चालकाचे ट्रकवरील नियंत्रण सुटले व ट्रक रस्त्याच्या बाजूला असलेल्या अमोल मोरे यांच्या घराच्या अंगणात घुसला. या अपघातात घराचे मोठे नुकसान झाले. तसेच अंगणात उभी असलेल्या दुचाकीचेदेखील नुकसान झाले. या अपघातावेळी अमोल मोरे यांची आई आणि भाऊ घरातच झोपले होते. सुदैवाने त्यांना कोणतीही दुखापत झाली नाही. पोलीस तपास करत आहेत.


**PSA MUMBAI**

Barat Mumbai Container Terminals (BMCT), is located in Jawaharlal Nehru in Maharashtra, India's largest and premier container gateway. BMCT started operations in 2018 and by the end of 2025, will be India's largest container terminal with an ultimate capacity of 4.8m TEU. BMCT seeks qualified persons for the below-mentioned position First preference shall be given to JNPT Project Affected Persons (PAP) to the extent qualified PAPs are available and willing to join, subject to PAP verification by JNPT.

**Container Equipment Specialist (CES) Quay Crane Operator**

This position holder will be responsible to operate various types of container handling equipment in accordance with the company's safe handling policy. Candidate should have an Engineering degree/diploma OR any graduate from a reputed university having a Minimum of 5-7 Years' Experience in container Terminal handling with a volume capacity of 1 million TEUs per annum. Should have Operating License / Certificate for QC and have minimum 2 years' Operating experience on QC.

Please note that this position will be on fixed term contract for 03 Yrs, and based on individual performance and available vacancies in the organisation, candidates can be considered for permanent roll of the company at the end of the contract period.

**Age Limit-Up to 45 years**

**Application Process**

Interested candidates should visit our recruitment portal **www.bmctpl.com** and peruse the job requirements for each position; thereafter register and follow the instructions detailed there to apply for the relevant position **and /or** send your application to resume@bmctpl.com

The applications must be received online before **18 Sep. 2022**. Only shortlisted candidates will be contacted.


# नेरळ पोलीस ठाण्याच्या बाप्पाची विसर्जन मिरवणूक



**कर्जत : बातमीदार**

नेरळ पोलीस ठाण्यामधील गणेशाचे अकराव्या दिवशी पोलीस कर्मचारी यांच्या उपस्थितीत जल्लोषात विसर्जन करण्यात आले. पाऊस प्रचंड प्रमाणात कोसळत असताना पोलीस आणि भाविक यांनी कोणतीही तमा न बाळगता विसर्जन मिरवणुकीत जल्लोष केला. दरम्यान, पोलिसांनी मागील महिनाभरातील बंदोबस्त यामुळे आलेला थकवा यानिमित्ताने घालविला.

नेरळ पोलीस ठाण्यामध्ये प्रतिष्ठापना करण्यात आलेल्या बाप्पाला अनंत चतुर्दशी नंतरच्या दिवशी विसर्जन करण्यात आले. गेले अनेक दिवस पोलीस कर्मचारी बंदोबस्तात व्यस्त होते आणि त्यात अनंत चतुर्दशीच्या बाप्पाचा विसर्जन सोहळा रात्री उशिरा संपला होता. त्यामुळे पोलिसांनी सर्व थकवा बाजूला ठेवून विसर्जनाची तयारी केली होती. पोलिसांच्या बाप्पाला निरोप देण्यासाठी रथ सजविण्यात आला होता तर विसर्जन मिरवणुकीसाठी सर्व भक्तांना फेटे बांधण्यात आले होते. सोबतीला ढोल ताशा पथक होते. नेरळ पोलीस ठाणे हद्दीमधील पोलीस पाटील, शांतता कमिटी सदस्य, वारकरी, महिला मंडळ, भजनी मंडळ यांच्या उपस्थितीत पोलिसांच्या बाप्पाच्या विसर्जन मिरवणूकमध्ये मोठी गर्दी होती. दरम्यान, जिल्हा पोलीस उपअधीक्षक विजय लगारे यांच्या उपस्थितीत शिस्तबध्द मिरवणूक निघाली. तीन तासांनी पोलिसांच्या बाप्पाची विसर्जन मिरवणूक गणेश घाट येथे पोहचली. त्यावेळी नेरळ ग्रामपंचायतीकडून पोलीस निरीक्षक आणि प्रभारी अधिकारी राजेंद्र तेंडुलकर यांचे स्वागत करण्यात आले.

**धो धो पावसातही भाविकांचा मोठा उत्साह**

## जाहीर नोटीस

सर्व तमाम लोकांस जाहीर नोटीसीने असे कळविण्यात येत आहे की, **मौजे रिटघर, तालुका-पनवेल, जिल्हा - रायगड** येथील खाली वर्णन केलेल्या व्यक्तिंच्या मालकी हक्काची, ताबेकब्जातील मिळकत/जमिन ही आमचे अशिल यांनी कायमस्वरूपी विकत घेण्याचे ठरविले आहे. तरी सदरहू मिळकतीचे मालकी हक्काबाबत खात्री करून घेण्याकरिता प्रस्तुत जाहिर नोटीस प्रसिध्द करीत आहोत. सदर मिळकतीचे वर्णन येणेप्रमाणे :

**-: मिळकतीचे वर्णन :-**

**मौजे -रिटघर, तालुका - पनवेल, जिल्हा - रायगड**

| गाव | भोगवटादाराचे नांव | गट क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे. आर. पॉ. | आकार रू.पै. |
|---|---|---|---|---|
| रिटघर | मारूती बळीराम भोपी<br>शाळूबाई बळीराम भोपी<br>जनाबाई प्रकाश फडके<br>लक्ष्मी सिताराम चौधरी<br>रेणुका बळीराम भोपी<br>जगदिश मारूती भोपी | १४२ | ०-३९-४०<br>पोट खराबा ०-०१-३०<br>एकूण क्षेत्र ०-४०-७० | २.१९ |
| रिटघर | जगदिश मारूती भोपी | १४९ | ०-३४-९०<br>पोट खराबा ०-०२-३०<br>एकूण क्षेत्र ०-३७-२०<br>पैकी ०-१६-०० | ६.६२ |
| | एकूण विक्री करावयाचे क्षेत्र | | **०-५६-७०** | |

सदरहू वर ही जागा, जमिन व मिळकतीसंबंधी अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचे गहाण, दान, बक्षीस, लिज, पोटगी, कोर्ट जप्ती, अगर अन्य कोणत्याही प्रकारचे इजमेंट, दावे, फरोक्त, वचनचिठ्ठी, खरेदीखत, तारण, भाडेकरूपणाचा हक्क, लिज, साठेकरार, कुलमुखत्यारपत्र, करार-मदार, मालकी हक्क, हितसंबंध असलेल्या व्यक्तींना, इतर वारसांचा वा संबंधितांना ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून **०७ दिवसांच्या आत** आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरूप विषद करून प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह **खालील पत्त्यावर, समक्ष तथा रजिस्टर पोस्टाने लेखी कळवावे.** जर वरील मुदतीत कोणाकडूनही काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजाविरहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही किंवा असल्यास सदर हरकती, तक्रारी रद्दबातल आहेत किंवा त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरून आमचे अशिल वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित व्यवहार पूर्ण करतील व विहित मुदतीच्या नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकती/तक्रारी आमचे अशिलावर बंधनकारक असणार नाहीत याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

**ठिकाण: पनवेल**
**दिनांक: १०/०९/२०२२**

**सही/-**
**ॲड. प्रतिभा भरत कडू**
**पत्ता : शॉप नं. १३० म्युनिसिपल शॉपींग कॉम्पलेक्स पहिला मजला भाजी मार्केट जवळ पनवेल , ता. पनवेल मो. नं ८८२८४९७६७८**

## पनवेल महानगरपालिका
## ता. पनवेल, जि. रायगड ४१० २०६

जा.क्र. पमपा/जनसंपर्क./३१२२/प्र.क्र.२३१/२८७/२०२२ दिनांक :०९/०९/२०२२

**दीनदयाळ अत्यंत्योदय योजना- राष्ट्रीय उपजिविका अभियान** (DAY-NULM)
**फेरीवाल्यांसाठी जाहीर आवाहन**

पनवेल महानगरपालिके मार्फत दीनदयाळ अंत्योदय योजना- राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान अंतर्गत ''नागरी पथविक्रेत्यांना सहाय्य''या उपांगाच्या प्रभावी अमंलबजावणीसाठी पनवेल महानगरपालिका क्षेत्रासाठी सर्व (स्थिर, फिरते, व तात्पुरते) फेरीवाल्यांचे सर्वेक्षण (Biometric) पध्दतीने करण्यात येत आहे. आत्तापर्यंत महानगरपालिका क्षेत्रामध्ये एकूण ७७१० फेरीवाल्यांचे सर्वेक्षण करण्यात आले आहे व त्यापैकी ३२७३ फेरीवाल्यांनी सर्वेक्षण झाल्यानंतर संबंधित कागदपत्रे महानगरपालिकेकडे जमा केली आहेत. उर्वरित ४४३७ फेरीवाल्यांचे कागदपत्र जमा करण्याचे प्रलंबित आहेत. तरी महानगरपालिकेकडून सर्व फेरीवाल्यांना आवाहन करण्यात येते की, ज्या फेरीवाल्यांचे सर्वेक्षण झालेले नाही, त्यांनी सदर जाहिरात प्रसिध्द झाल्याापासून आठ दिवसामध्ये आपले सर्वेक्षण करून घ्यावे तसेच ज्यांचे सर्व्हेक्षण झालेले आहे, परंतु कागदपत्रे जमा केली नाहीत त्यांनी सुध्दा आठ दिवसामध्ये खाली नमुद केलेल्या पत्यावर आपली कागदपत्रे जमा करावित.

फेरीवाला सर्वेक्षणासाठीचे पात्रता निकष व आवश्यक कागदपत्रे खालील प्रमाणे आहेत.

| अ.क्र. | फेरीवाला म्हणून नोंदणी करण्यासाठीचे पात्रता निकष | अ.क्र. | सर्वेक्षणसाठी फेरीवाल्यांकडे आवश्यक असणारे कागदपत्र |
|---|---|---|---|
| १ | फेरीवाला भारतीय नागरिक असावा. | १ | आधारकार्ड (फेरीवाल्याने आपला आधार नंबर त्याच्या मोबाईल नंबर सोबत जोडून घेणे आवश्यक आहे) |
| २. | फेरीवाला महाराष्ट्रातील अधिवासी असावा. | २ | तहसीलदार यांनी दिलेले अधिवास प्रमाणपत्र (डोमिसाईल सर्टिफिकेट) |
| ३. | सर्वेक्षणच्या दिनांकास फेरीवाल्याचे वय १६ वर्षापेक्षा कमी असणार नाही. | ३ | रेशनकार्ड (शिधापत्रिका) |
| ४. | पथविक्री खेरीज उपजिविकेचे इतर कोणतेही साधन असणार नाही . | ४ | जातीचे प्रमाणपत्र (SC,ST,MINORITY) आदी प्रवर्गातील असल्यास |
| | | ५ | दिव्यांग प्रमाणपत्र (दिव्यांग असल्यास) |
| | | ६ | विधवा असल्यास (पतीचे मृत्यू प्रमाणपत्र) . |
| | | ७ | परित्यक्ता, किंवा घटस्फोटीत असल्यास (प्रमाणीकरण कागदपत्र) |
| | | ८ | पासपोर्ट आकाराचा फोटो-२ |

सबब, सर्वेक्षण पुर्ण झाल्यानंतर ज्या फेरीवाल्यांनी संबंधीत कागदपत्रे सादर केली आहेत, अशा फेरीवाल्यांची अंतिम पात्र यादी प्रसिध्द करण्यात येऊन त्यांना फेरीवाला असल्याचे ओळखपत्र व प्रमाणपत्र देण्यात येतील. ज्या फरीवाल्यांकडे ओळखपत्र व प्रमाणपत्र असेल त्यानांच अधिकृत फेरीवाला म्हणून व्यवसाय करणेची परवानगी देण्यात येईल. याची सर्व फेरीवाल्यांनी नोंद घ्यावी. तरी लवकरात लवकर फेरीवाल्यांनी सर्वेक्षण करून घ्यावे व कागदपत्रे सादर करावित.

फेरीवाला सर्वेक्षण करणेकरिता खालील नंबरवर संपर्क साधावा.

श्री. नवनाथ थोरात- ९८५०७२५५८४

श्रीमती विनया म्हात्रे- ८०९७०४४८४४

तसेच सर्वेक्षण झालेल्यांनी खालील पत्यावर आपली कागदपत्रे सादर करावीत.

पत्ता :- कै. विलासराव देशमुख व्यापारी संकुल, पहिला मजला गाळा क्र. ११४, प्रभाग समिती ड पनवेल महानगरपालिका, शिवाजी चौक, पनवेल.

पमपा/ DAYNULM/ SUSV २४२२/प्र.क्र.१९/६७/२०२२
दिनांक :- ०९/०९/२०२२

**सही/-**
**कैलास गावडे**
(उप आयुक्त)
पनवेल महानगरपालिका

## निवडक

### पळस्पे गावातून तरुण हरवला

**पनवेल :** राहत्या घरातून कोणास काही एक न सांगता एक तरुण कोठेतरी निघून गेल्याने तो हरवल्याची तक्रार शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.



राहुल कोकरे (वय २०, रा. पोलीस कॉलनी, पळस्पे गाव) असे बेपत्ता तरुणाचे नाव असून त्याचा रंग सावळा, उंची पाच फूट पाच इंच, बांधा बाजबूत, चेहरा गोल, डोक्याचे केस काळे, नाक सरळ, दाढी व मिशी असून अंगात पिवळा टीशर्ट व निळी जीन्स व सोबत मोबाइल आहे. या तरुणाबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास शहर पोलीस ठाणे (०२२-२७४५२३३३) किंवा पोलीस नाईक म्हात्रे यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### पीरवाडी येथे स्वच्छता मोहीम


**उरण :** तालुक्यातील पीरवाडी समुद्र किनाऱ्यावर शनिवारी (दि. १०) स्वच्छता अभियान राबविण्यात आले. मनसेचे रायगड जिल्हाध्यक्ष संदेश ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात आला.



या वेळी जिल्हा सचिव अविनाश पडवळ, जिल्हा उपाध्यक्ष प्रवीण दळवी, उरण तालुका अध्यक्ष सत्यवान भगत, सचिव अल्पेश कडू, पनवेल तालुकाध्यक्ष रामदास पाटील, पनवेल उपशहराध्यक्ष संजय मुरकुटे, उरण शहराध्यक्ष धनंजय भोरे, तालुका उपाध्यक्ष राकेश भोईर, दीपक पाटील, विभाग अध्यक्ष बबन ठाकूर, गणेश तांडेल, द्रोणागिरी शहर अध्यक्ष रितेश पाटील, जयसिंग पाटील, प्रणव कारखानीस, प्रदीप ठाकूर, उल्हास गायकवाड, ओम सेरे, सुभाष पाटील, उरण उपशहर अध्यक्ष हितेश साळुंखे आदी उपस्थित होते.

### ढोल ताशाच्या गजरात बाप्पाला निरोप

**नवी मुंबई :** नवी मुंबईचा राजाला ढोल ताशांच्या गजरात भावपूर्ण वातावरणात निरोप देण्यात आला.



नवी मुंबईच्या राजाचे विसर्जन क्रेनच्या साहाय्याने तुर्भे गावातील तलावात करण्यात आले. या वेळी तुर्भे गाव व परिसरातील हजारो गणेशभक्त उपस्थित होते. शिवछाया मित्र मंडळ हे ५२ वे वर्ष साजरा करीत असताना गणेशोत्सवाच्या मिरवणुकीमध्ये पारंपरिक ढोल पथक आणि पुष्पवृष्टी उधळत शिस्तबद्ध पद्धतीने हा विसर्जन सोहळा झाल्याचे शिवछाया मित्र मंडळाचे अध्यक्ष अंकुश वैती यांनी सांगितले.

---

### नवी मुंबई वाहतूक विभागाने शोधली अपघातप्रवण क्षेत्र

# तब्बल ३६ ठिकाणी मृत्यूचा सापळा




#### सर्वाधिक धोका असलेल्या जागा

**अपघातप्रवण क्षेत्रामध्ये वाशी खाडी पुलाचे दोन्ही लेन, कांदा-बटाटा मार्केट प्रवेशद्वार ते अरेंजा सिग्नल, दक्षिणमुखी हनुमान मंदिर ते आयसीएल शाळा, दत्त मंदिर-एलपी उरणफाटा उड्डाण पूल, तुर्भे नाका, तुर्भे स्टोअर, मोराज सर्कल यासह पामबीच मार्गावरील सारसोळे सिग्नल, अक्षर सिग्नल, टीएस चाणक्य सिग्नल, सायन-पनवेल महामार्गावरील सीबीडी उड्डाण पूल, बेलपाडा बस स्टॉप, हिरानंदानी उड्डाण पूल खारघर, खारघर टोल नाका ते कोपरा उड्डाण पूल, आसूडगाव, कळंबोली सर्कल, कळंबोली गाव कट, कळंबोली ब्रीज, कळंबोली कॉलनी ब्रीज, खिडूकपाडा, नावडा फाटा, भिंगारी व्हिलेज, कोळखे व्हिलेज, कर्नाळा घाट आदी ब्लॅक स्पॉट्‌सचा समावेश आहे.**

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत होणाऱ्या अपघातांमधील मृतांची संख्या अधिक असल्याने नवी मुंबई वाहतूक विभागाने वाढते अपघात रोखण्यासाठी ३६ अपघातप्रवण क्षेत्र (ब्लॅक स्पॉट) शोधले आहेत. या ठिकाणी आवश्यक त्या उपाययोजना करण्याच्या सूचना तीन महिन्यांपूर्वीच नवी मुंबई वाहतूक विभागाच्या पोलीस उपायुक्तांनी विविध प्राधिकरणांना केल्या आहेत, मात्र त्याकडे दुर्लक्ष होत असल्याने अपघातांवर नियंत्रण मिळवण्यात अपयश येत आहे.

नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत जानेवारी ते ऑगस्ट या ८ महिन्यांमध्ये एकूण ४६४ अपघातांमध्ये १९५ व्यक्तींचा मृत्यू झाला आहे. विशेष म्हणजे, अपघातातील मृतांमध्ये दुचाकी अपघातांची संख्या सर्वाधिक असून त्यात चालकासह प्रवासी तसेच पादचारी अशा एकूण ९७ जणांचा बळी गेला आहे. त्यामुळे नवी मुंबई पोलिसांनी आयुक्तालयाच्या हद्दीतील वाढते



अपघात रोखण्यासाठी विविध उपाययोजना करण्यावर भर दिला आहे. तसेच वाहतुकीच्या नियमांचे पालन करण्यासाठी जनजागृतीदेखील करण्यात येत आहे. मात्र, त्यानंतरदेखील नियमांचे उल्लंघन होतच असल्याने अपघातांच्या संख्येत वाढच होत आहे.

त्यामुळे नवी मुंबई वाहतूक विभागाने नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीतील सर्व रस्त्यांचा सर्वे करून वारंवार अपघात घडणारी ३६ अपघातप्रवण क्षेत्र (ब्लॅक स्पॉट) शोधली आहेत.

**शहरातील अपघातप्रवण क्षेत्रांची माहिती विविध शासकीय प्राधिकरणांना देण्यात आली आहे. तसेच त्यांच्या प्रतिनिधींसोबत नमूद ब्लॅक स्पॉट्‌सची पाहणीदेखील करण्यात आली आहे. लवकरच नवी मुंबई व पनवेल महापालिका, सिडको, एमएमआरडीए, सा. बां. विभाग व भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या प्रतिनिधींसोबत या ब्लॅक स्पॉट्‌ससंदर्भात बैठक घेऊन उपाययोजना केल्या जातील.**

**-पुरुषोत्तम कराड, पोलीस उपायुक्त, वाहतूक नियंत्रण विभाग, नवी मुंबई**

---

## उरणमध्ये ९९९ घरगुती, १४ सार्वजनिक गणेशमूर्तींचे विसर्जन

**उरण : वार्ताहर**

उरणमध्ये ९९९ घरगुती आणि १४ सार्वजनिक गणेशमुर्तींचे भावपूर्ण वातावरणात विसर्जन करण्यात आले.

या वेळी आमदार महेश बालदी, उपनगराध्यक्ष जयविन कोळी, भाजप तालुकाध्यक्ष रवी भोईर, शहराध्यक्ष कौशिक शाह, सर्व नगरसेवक आदींसह नागरिक उपस्थित होते. मुख्याधिकारी संतोष माळी यांच्या मार्गदर्शनाखाली विमला तलाव येथे गणेश मूर्तींचे विसर्जन करण्यात आले. भवरा तलाव, मोरा जेट्टी यथे गणेशमूर्तींना विसर्जनासाठी व्यवस्था करण्यात आली होती. कनिष्ठ अभियंता झुंबर माने, आरोग्य निरीक्षक हरेश तेजी, नगर सहाय्यक रचनाकार सचिन भातुसे, कर निरीक्षक संजय डापसे, उरण नगर परिषदेचे कर्मचारी अधिकारी उपस्थित होते.

नगर परिषदेचे विमला तलाव येथे मूर्ती विसर्जन करण्यासाठी सालाबादप्रमाणे



देऊळवाडी युवक मंडळ व देऊळवाडी ग्रामस्थ यांच्या वतीने सहकार्य केले जाते. निर्माल्य गोळा करण्यासाठी विशेष व्यवस्था करण्यात आली होती. जमा झालेल्या निर्माल्यापासून बायोगॅस व खतनिर्मिती नगर परिषद करणार आहे, असे मुख्याधिकारी माळी यांनी सांगितले.



## चोरीप्रकरणी दोघांना अटक

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

तुर्भे एमआयडीसी पोलिसांनी सन्नी उर्फ डाकू विकास तरे (२५) व त्याच्या अल्पवयीन साथीदाराला अटक केली आहे. या दोघांनी नवी मुंबईच्या विविध भागांतून चार मोटरसायकल व सहा मोबाइल फोन चोरल्याचे तपासात उघड झाल्याची माहिती परिमंडळ-१चे पोलीस उपायुक्त विवेक पानसरे यांनी दिली आहे.

तुर्भे एमआयडीसी पोलीस ठाण्यात वाहन चोरीला गेल्याची तक्रार २ सफ्टेंबर रोजी दाखल करण्यात आली होती. या प्रकरणाचा तपास करताना गुप्त बातमीदाराने दिलेल्या माहितीच्या आधारे पोलिसांनी कोपरखैरणे सेक्टर-१९ मधून आरोपी सन्नी उर्फ डाकू विकास तरे (वय २५) याला तसेच त्याच्या अल्पवयीन साथीदाराला ताब्यात घेतले होते. या दोघांची चौकशी केली असता तुर्भे भागातून मोटरसायकलची चोरी केल्याची कबुली त्यांनी दिली. तसेच कोपरखैरणे, नेरूळ आणि खारघर या भागातून तीन मोटरसायकल व सहा मोबाइल फोन चोरल्याचे त्यांनी कबूल केले आहे. पोलिसांनी या आरोपीकडून चार मोटरसायकल व सहा मोबाइल असा सव्वा चार लाख रुपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत केला असून न्यायालयाने त्यांची रवानगी पोलीस कोठडीत केली आहे.

---

## रसायनी पोलीस ठाण्याच्या गणरायाला भक्तिभावाने निरोप

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

'गणपती बाप्पा मोरया... पुढच्या वर्षी लवकर या...' असा जयघोष करीत रसायनी पोलीस ठाण्याच्या गणरायाला अनंतचतुर्दशीच्या दुसऱ्या दिवशी भक्तीमय वातावरणात निरोप देण्यात आला.

रसायनी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील मोहोपाडा तलाव, रिस पुल, कांबे गणेश घाट, वावेघर गणेश घाट, तळेगाव वाडी घाट, कासप गणेश घाट येथे दिड दिवस, पाच दिवस, सात दिवस आणि अनंतचतुर्दशीच्या गणेशाचे विसर्जन करण्यासाठी परिसरात चोख पोलीस बंदोबस्त करून गेले दहा दिवस रसायनी पोलीस सार्वजनिक गणपती व घरगुती गणपती यांच्या सेवेत दिवसरात्र मग्न होते.



(छाया : राकेश खराडे)

अनंत चतुर्दशीच्या गणपतींचे विसर्जन झाल्यानंतर दुसऱ्या दिवशी रसायनी पोलीस ठाण्याच्या गणपतीची वरिष्ठ निरीक्षक कैलास दादाभाई डोंगरे, सहाय्यक पोलीस निरीक्षक गोरक्षनाथ बाळवडकर, मुल्ला, उपनिरीक्षक धनाजी काळे, उपनिरीक्षक म्हामुणकर, पवार यांच्यासह कर्मचाऱ्यांनी मनोभावे पूजन करून आरती केली, तर काही कर्मचाऱ्यांनी बाप्पाला नवसाचे साकडेही घातले. यानंतर रसायनी पोलीस ठाण्यातून पाताळगंगा पूल अशी वाजत-गाजत विसर्जन मिरवणूक काढण्यात आली.

या मिरवणुकीत रसायनी पोलिसांनी पिवळ्या रंगाचा कुडता परिधान केला होताम तर महिला पोलिसांनीही पारंपरिक नववारी साडीचा वेश परिधान केला होता. या मिरवणुकीत रसायनी पोलीस कर्मचाऱ्यांनी कुटूंबीयांसह बाप्पाला निरोप देताना डीजे व बॅंजोच्या तालावर थिरकत बाप्पाची विसर्जन मिरवणूक पाताळगंगा श्री रसेश्वर शिव मंदिरानजीकच्या पाताळगंगा नदीजवळ आली. अखेर गणरायाचे नदीपात्रात विसर्जन करीत बाप्पाला भक्तिभावाने निरोप देण्यात आला.

## नवी मुंबई पोलिसांच्या गणेशमूर्तींचे विसर्जन

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

अनंत चतुर्दशीला मोठ्या प्रमाणात होणारे गणेश विसर्जन निर्विघ्नपणे पार पडण्यासाठी चोख बंदोबस्त ठेवणाऱ्या पोलिसांच्या गणेश मूर्तींचे विसर्जन संध्याकाळपासून सुरू झाले होते. नवी मुंबई पोलीस आयुक्तालय क्षेत्रात २० पोलीस ठाणी असून यंदा सर्वच ठिकाणी गणपती विराजमान झाले होते.

गणेश विसर्जनसाठी होणारी गर्दी मिरवणुका पाहता कुठलाही अनुचित प्रकार घडत उत्साहावर विरजण पडू नये म्हणून पोलीस अहोरात्र जागता पहारा देतात. यात त्यांच्या कार्यालयात विराजमान झालेल्या बाप्पांच्या मूर्तीचे विसर्जन एक दिवस उशिरा केले जाते. कोरोनावर नियंत्रण मिळाल्याने दोन वर्षांनी



मोकळा श्वास घेत गणपती सण आणि शेवटी विसर्जन मिरवणूचा जसा मनमुराद आनंद सामान्य जणांनी लुटला अगदी त्याच प्रमाणे पोलिसांनीही लुटला. नेहमी गणवेशात दिसणारे पोलीस अधिकारी कर्मचारी या वेळी भारतीय पारंपरिक वेशात वावरत होते. विशेष म्हणजे पोलिसी शिस्त असली तरीही वरिष्ठ कनिष्ठ हा भेद दिसत नव्हता सर्वच जण मित्रांप्रमाणे हसून खेळून मिरवणुकीचा आनंद लुटताना दिसत होते. बॅंड ढोल ताशासह सजवलेल्या वाहनातून गणपती बाप्पाची मिरवणूक विसर्जन स्थळाकडे रवाना होत होती. यातील खारघर पोलिसांनी तर केलेली रथाची सजावट सर्वांचे लक्ष वेधून घेत होती.

---

## 'महिला आयोग आपल्या दारी'

**पनवेल : प्रतिनिधी**

महिला आयोग आपल्या दारी उपक्रमांतर्गत शुक्रवारी (दि.१६) अलिबाग येथे जनसुनावणीचे आयोजन करण्यात आले आहे. यासाठी कोणतीही पिडीत महिला कोणतीही पूर्वसूचना न देता थेट सुनावणीस उपस्थित राहून आपली लेखी समस्या आयोगापुढे मांडू शकणार आहे.

महाराष्ट्र राज्य महिला आयोगाचे कार्यालय मुंबई येथे असल्याने राज्यातील अनेक महिलांना मुंबई येथे पोहचणे शक्य होत नाही. महिलांना त्यांच्या तक्रारीबाबत स्थानिक स्तरावर आपले म्हणणे मांडण्याकरीता महिला आयोग आपल्या दारी या उपक्रमांतर्गत शुक्रवारी सकाळी ११ वाजता जिल्हा नियोजन भवन, जिल्हाधिकारी कार्यालय येथे जनसुनावणीचे आयोजन करण्यात आले आहे. तक्रारदार पिडीत महिलेस स्थानिक पातळीवर तत्काळ मदत व्हावी यासाठी रायगड जिल्ह्यातील पोलीस स्टेशनच्या महिला समुपदेशन, सहाय्य कक्ष, भरोसा सेल तसेच महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या विभागीय कार्यालयातील रायगड जिल्ह्यांच्या तक्रारी व इतर सेवाभावी संस्थेचे समुपदेशन केंद्र यांच्याकडील प्रकरणे या जनसुनावणीत ठेवण्याच्या सूचना आयोगाकडून देण्यात आल्या आहेत. कोणतीही पिडीत महिला कोणतीही पूर्वसूचना न देता थेट सुनावणीस उपस्थित राहून आपली लेखी समस्या आयोगापुढे मांडू शकेल. ज्या महिलांचे प्रकरण न्यायालयात सुरू असेल अथवा न्यायप्रविष्ठ असेल, अशी प्रकरणे या जनसुनावणीत स्विकारली जाणार नाहीत.

देशातील महिला आणि बालकांच्या पोषणाची स्थिती सुधारण्याच्या उद्देशाने सन २०१८ मध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पोषण अभियान सुरू केले होते. पोषण अभियानात बालके, किशोवयीन, गरोदर महिला आणि स्तनदा माता यांच्यामध्ये पोषण विषयक जागरुकता आणि प्रतिसाद वाढविण्याच्या अनुषंगाने सन २०१८ पासून सप्टेंबर महिन्यात सर्व भागधारकांसोबत एकत्रितपणे राष्ट्रीय पोषण माहे म्हणून साजता केला जातो. यानुषंगाने जनसुनावणीच्या दिवशी वेळ सकाळी १० ते ११ पोषण पंचायत अंतर्गत चर्चा सत्र आयोजित करण्याचेही प्रस्तावित करण्यात आले आहे.

राज्य महिला आयोगामार्फत आयोजित या जनसुनावणीकरिता वेळ ११ ते २ या वेळात जिल्ह्यातील ग्रामीण, शहरी क्षेत्रातील समस्याग्रस्त महिलांनी जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहावे, तसेच अधिक माहितीसाठी परिविक्षा अधिकारी योगीराज जाधव (७७९८१७१७७७ / ९९७०१२२६२३) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी विनीत म्हात्रे यांनी केले आहे.

## दुचाकीस्वाराला वाचविताना ट्रकचा अपघात; चालक जखमी

**नवी मुंबई : बातमीदार**


दुचाकीस्वाराला वाचविण्याच्या प्रयत्नात एका ट्रकचालकाने गाडी थेट दुभाजकावर घातल्याने झालेल्या अपघातात हा चालक जखमी झाला



आहे. ही घटना ठाणे बेलापूर मार्गावर दुपारी ३च्या सुमारास घडली. सुदैवाने गर्दी नसल्याने व अपघात उड्डाणपुलाच्या खाली झाल्याने फारशी वाहतूक कोंडी झाली नाही.

सुधाकर मढवी असे या अपघातात जखमी झालेल्या ट्रकचालकाचे नाव आहे. मढवी हे ठाणे बेलापूर मार्गावर ठाण्याच्या दिशेने जात असताना त्यांना ओव्हरटेक करून एक दुचाकीस्वार त्यांच्या गाडीच्या मार्गिकेवर अचानक आला. त्यामुळे मढवी यांनी गाडी थांबविण्याचा प्रयत्न केला, मात्र दुचाकी आणि ट्रकमधील अंतर फार कमी असल्याने त्यांनी ट्रक थेट उजवीकडे वळवला. यात दुचाकीस्वार वाचला, मात्र ट्रक दुभाजकाला धडकल्याने अपघात झाला. अचानक ट्रक उजवीकडे वळवल्याने दुभाजकाला धडकलेले चाक निखळलेच, शिवाय ट्रकचालक मढवी जखमी झाले. त्यांच्यावर नजीकच्या रुग्णालयात उपचार करून घरी सोडण्यात आले.

गणेश विसर्जन झाल्याच्या दुसऱ्या दिवशी रस्त्यावर फारशी गर्दी नव्हती. त्यात उड्डाणपुलाखाली अपघात झाल्याने ठाणे-बेलापूर मार्गावर अपघाताचा विपरीत परिणाम झाला नाही, अशी माहिती महापे विभागाचे वाहतूक विभाग वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजीव शेजवळ यांनी दिली, मात्र अपघात झाल्यानंतर बघ्यांची गर्दी झाली होती.



# रायगडात जोरदार पावसामुळे शेती जमीनदोस्त

## शेतकरी हवालदिल; नुकसानभरपाईची मागणी

**पाली : धम्मशिल सावंत**

रायगड जिल्ह्यात सततच्या पाऊस आणि महापुरामुळे पेण, गडब, सुधागड, अलिबाग, महाड, पोलादपूर, माणगाव व अन्य तालुक्यात भातशेतीचे मोठे नुकसान झाले आहे. बऱ्याच ठिकाणची शेती पुराच्या पाण्याच्या प्रवाहाने वाहून गेली आहे. भातशेतीसह नाचणी, वरी, पालेभाजी या पिकांचेदेखील मोठे नुकसान झाले आहे. दरम्यान, हातातोंडाशी आलेला घास गळून पडल्याने शेतकरी हवालदिल झाला आहे.



सप्टेंबर महिन्यात पावसाने चांगलाच जोर धरला. बऱ्याच ठिकाणी पूरस्थिती निर्माण झाली. सगळीकडे गणेशोत्सवाचा माहोल सुरु होता तर दुसरीकडे पावसाचा जोर होता. काही ठिकाणी प्रवाहाच्या पाण्याने धुपून गेलेली माती शेतीत दगड गोट्यासह जाऊन उंचवटे तयार झालेले आहेत. शेतकऱ्यांची पिके जमिनीखाली गाडली गेली आहेत. हे मातीचे ढिगारे मनुष्य बळाने निघणारे नसून मोठी अवजारे लावून काढावे लागणार आहेत. जमिनी पूर्वपदावर आणण्यासाठी तज्ज्ञांच्या सल्ल्याने योजना तयार करुन नुकसान झालेली सर्व शेती पूर्ववत पिकाखाली आणणे गरजेचे आहे. तसेच आजघडीला भातशेती व अन्य पीक शेतीचे झालेल्या नुकसानीचे पंचनामे करून शेतकऱ्यांना जलद नुकसान भरपाई द्यावी अशी मागणी गडब, कासु, आमटेम, खारेपाट व अन्य विभागातील नुकसानग्रस्त शेतकऱ्यांनी केली आहे. या दरम्यान बोलताना शेतकरी तुकाराम पाटील म्हणाले, महापुरात होत्याचे नव्हते झाले. कापणीला आलेली पिके उद्ध्वस्त झाली. आमच्या जगण्याचे साधन हिरावून घेतले. आम्हाला पुन्हा उभे राहण्यासाठी आवश्यक ती मदत होणे गरजेचे आहे. तर शेतकरी नारायण म्हात्रे यांनी सांगितले की, आमच्या उदरनिर्वाहाचे साधन शेती आहे. मात्र निसर्गाच्या लहरीपणामुळे शेती व्यवसाय धोक्यात आला आहे. भातशेती पाण्याखाली गेली. पिके वाहून गेली आहेत. बांध बंदिस्तीचा प्रश्न सुटत नाही. शेतकऱ्यांवर अस्मानी संकट ओढविले आहे. यामुळे मदत तातडीने मदत मिळणे गरजेचे आहे. दरम्यान, एकेकाळी भाताचे कोठार अशी ओळख असलेल्या या जिल्ह्याची ही ओळख आता पुसते की काय अशी चिंता सतावू लागली आहे.

पेण तहसील कार्यालयातून मिळालेल्या आकडेवारीनुसार तालुक्यात २६७१.७ मिमी पाऊस पडल्याची नोंद झाली आहे. गडब, रोडे, कांदळे या गावांना लागुन असलेल्या डोंगरावर ढगफुटी झाल्याने विजांच्या कडकडाटाने पावसाला सुरुवात झाली आणि अशरक्षः ज्या भागात ढगफुटी झाली त्या गावांना पावसाने झोडपून काढले. भातशेती पूर्णपणे जमिनीत गाडली गेली. पिके उद्ध्वस्त झाली. कित्येक घरांमध्ये पाणी शिरले. घरातील जीवनावश्यक वस्तू भिजल्या.

पेण शहरामध्ये अनेक दुकानांमध्ये पाणी जाऊन लाखोंचे नुकसान झाले. पेण तालुक्यातील भाल येथील देवीदास म्हात्रे यांच्या घरावर वीज पडून सर्व इलेक्ट्रानिक वस्तू निकामी झाल्या. देवीदास म्हात्रे व त्यांच्या पत्नीचे नशीब बलवत्तर म्हणून त्या थोडक्यात बचावल्या.

नैसर्गिक व अस्मानी संकटाने शेतकरी शेतीपासून दूर चालला आहे, अतिवृष्टी, महापूर, ओला, कोरडा दुष्काळ, ढगफुटीने पिकांचे मोठे नुकसान होतेय. भातशेती करणारा शेतकरी भातशेती का सोडत आहे याचा अभ्यास करण्यासाठी समिती संघटीत करावी. समितीमध्ये प्रगतशील, अभ्यासू शेतकऱ्यांचा तज्ज्ञांचा समावेश करुन शेतकऱ्यांच्या शेतीचा, शेतकऱ्यांचा राहणीमानाचा, व त्याला कशा प्रकारच्या मदतीची आवश्यकता आहे याचा अभ्यास होऊन समितीच्या शिफारशीनुसार भातपिक शेतकऱ्यांना सोई सुविधा व भात पिकांचा योग्य मोबदला देण्यात यावा अशी मागणी रायगड़ जिल्हा शेतकरी संघटनेचे अध्यक्ष हरिचंद्र शिंदे यांनी केली आहे.

### जिल्ह्यात खरीप अंतर्गत मोठी पेरणी

***रायगड जिल्ह्यातील १५ तालुक्यात खरीप हंगामासाठी जिल्ह्यात एकूण १ लाख १४ हजार ४४३ हेक्टर क्षेत्रावर पेरणीचे नियोजन करण्यात आले. यामध्ये भात पेरणी एक लाख पाच हजार २६१ हेक्टर इतक्या क्षेत्रावर करण्यात आली. त्या खालोखाल ७१२८ हेक्टरवर नाचणी, ९७५ हेक्टर इतर तृणधान्य, ९०६ हेक्टर तूर, १७३ हेक्टर इतर कडधान्य लागवड करण्यात आली आहे. रायगड जिल्ह्याचे भौगोलिक क्षेत्र सहा लाख ८६ हजार ८९२ हेक्टर इतके आहे. निव्वळ पेरणीखालील क्षेत्र दोन लाख एक हजार ३२२ हेक्टर इतके आहे. खरीप हंगामाचे सर्वसाधारण क्षेत्र १ लाख ४१ हजार २०० हेक्टर रब्बी हंगामाचे सर्वसाधारण क्षेत्र २१ हजार १०० हेक्टर इतके आहे.***

**रायगड जिल्ह्यातील पेण तालुक्यात झालेल्या ढगफुटीमुळे गडब, डोलवी, कांदळे, कांदळेपाडा, रोडा, निधवळी, गागोदे, करोटी, कासू, पाबळखोरे, खारेपाट या भागांमध्ये शेतीसह घरांचे नुकसान झाले आहे. या नुकसानीचे पंचनामे करण्याचे काम प्रशासनाकडून सुरु करण्यात आले आहे.**
**–स्वप्नाली डोईफोडे , तहसीलदार**

# भिसेखिंडीत ट्रक आणि दुचाकीचा अपघात

## दोन्ही वाहने दरीत कोसळली; एक ठार



**पाली : प्रतिनिधी**

भिसे खिंडीत कोळसाने भरलेला ट्रक आणि मोटारसायकलची धडक बसून दोन्ही वाहने दरीत कोसळली तर मोटारसायकलस्वार कोळशाच्या ढिगाऱ्याखाली सापडून ठार झाला.

रोहा भिसेखिंड वाहतूक व प्रवासाच्या दृष्टीने धोकादायक बनली आहे. सातत्याने या खिंडीत अपघात होत असतात, रोह्यातून जेट्टीवरून कोळशाने भरलेला ट्रक हा सायंकाळी भिसे खिंडी मार्गे येत होता. यावेळी भिसे खिंडीत आल्यावर मधोमध अपघाती वळणावर कोळशाने भरलेल्या ट्रकची धडक मोटारसायकलला बसली. ट्रक व मोटारसायकलही खोल दरीत कोसळली. मोटारसायकल स्वार कोळशाच्या ढिगाऱ्याखाली अडकला. घटनेची खबर मिळताच मदतकार्य करण्यासाठी डिवायएसपी किरणकुमार सूर्यवंशी, पोलीस निरीक्षक राजन जगताप व स्थानिक ग्रामस्थ हरीचंद्र तेलंगे, सोपान जांभेकर, किशोरभाई म्हात्रे, साईनाथ धुळे व इतर मदतीसाठी पोहचले आणि मदतकार्य केले. अशातच मुसळधार पाऊस व खोल दरी यामुळे मदतकार्यात अडथळे निर्माण झाले. भिसे खिंडीत तासन्तास वाहतूककोंडी झाली होती. दोन तासांनी अथक प्रयत्न करून मोटारसायकल स्वारास बाहेर काढण्यात आले. त्यानंतर वाहतूक सुरू झाली. दरम्यान, मनसे नेते हरीचंद्र तेलंगे यांनी भिसे खिंडीत होणारे अपघात यावर चिंता व्यक्त केली, भिसे खिंडीतून होणारी ओव्हरलोड वाहतूक थांबावी अशी मागणी तेलंगे यांनी केली.

# हिरवळ महाविद्यालयात शिक्षक दिन उत्साहात

**माणगाव : प्रतिनिधी**

हिरवळ एज्युकेशन ट्रस्टचे ज्युनिअर कॉलेज ऑफ आर्ट्स कॉमर्स अँड सायन्स व कॉलेज ऑफ कॉम्प्युटर सायन्स अँड इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी, महाड महाविद्यालयात शिक्षक दिनाचे औचित्य साधून महाविद्यालयाच्या विद्यार्थी परिषदेतर्फे शिक्षक दिन साजरा करण्यात आला.



या निमित्ताने विद्यार्थ्यांनी विविध शिक्षकांच्या भूमिका साकारून विविध वर्गावर शिकवणीचे काम केले. तसेच डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन् व महात्मा ज्योतिबा फुले आणि सावित्रीबाई फुले यांना शिक्षक दिन साजरा करून शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी मानवंदना दिली.

विद्यार्थ्यांनी शिक्षकाबद्दलचे आपले मत व्यक्त केले. महाविद्यालयाचे प्राचार्य सुदेश कदम यांनी विद्यार्थ्यांना शिक्षक दिनाचे महत्त्व सांगून शिक्षकांना जीवनाचा शिल्पकार का म्हटले जाते यावर मार्गदर्शन केले. तसेच विद्यार्थी परिषदेच्या प्रमुख प्रा. मनीषा बर्गे यांनी विद्यार्थ्यांना शिक्षकांचा आदर कसा केला पाहिजे व का केला पाहिजे यावर मार्गदर्शन केले. शिक्षक दिनानिमित्त शिक्षक म्हणून भूमिका साकारणाऱ्या विद्यार्थ्यांचे महाविद्यालयातर्फे कौतुक करून त्यांना शुभेच्छा देण्यात आल्या. हिरवळ संस्थेचे अध्यक्ष किशोर भाई धारिया, संचालिका सोनाली धारिया तसेच हिरवळ एज्युकेशन ट्रस्ट च्या प्रमुख सल्लागार डॉ. संध्या कुलकर्णी व महाविद्यालयाचे प्राचार्य सुदेश कदम यांनी शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व सर्व विद्यार्थ्यांना शिक्षक दिनाच्या शुभेच्छा देऊन त्यांना भविष्यात अशा प्रकारचे उपक्रम राबविण्यासाठी प्रोत्साहन दिले.

# पेण झिराळ आळीत आढळला मृतदेह

**पेण : प्रतिनिधी**

पेण शहरातील झिराळ आळी मार्गावर पड्कि जागेत एका ३० वर्षीय युवकाचा मृतदेह आढळून आला आहे.

पेण नगरपरिषदेमध्ये कंत्राटी सफाई काम करणाऱ्या यल्लम्मा सुब्रमण्यम अर्जुन (वय ३०) या युवकाचा मृतदेह पोलिसांना बंद पडलेल्या मनोहर राईस मिलच्या जागेत कुजलेल्या अवस्थेत आढळून आला आहे. या युवकाचा मृत्यू हा दारूच्या अतिसेवनाने लिव्हर खराब होऊन झाल्याचे प्राथमिक अहवालात निष्पन्न झाले आहे. पेण पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद झाली आहे.

# आधार जोडणी अंतर्गत दासगावमध्ये शिबिर

**महाड : प्रतिनिधी**

संपूर्ण राज्यात मुख्य निवडणूक अधिकारी महाराष्ट्र राज्य यांच्या आदेशानुसार राज्य व्यापी आधार जोडणी २०२२ अंतर्गत शिबिर सुरू आहे. या अंतर्गत मतदान कार्डला आधार कार्ड जोडणी केल्याने एका मतदाराला एकाच ठिकाणी मतदान करता येईल यामुळे बोगस मतदानाला या पुढे आला बसणार आहे. रविवारी महाड तालुक्यातील दासगाव, वहूर, केंबुर्ली, वीर, टोळ आणि दाभोळ या गावांमध्ये या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

महाराष्ट्रात आज हजारो मतदार असे आहेत की, ज्यांची मतदान यादीत दोन दोन ठिकाणी नावे आहेत. निवडणुकीच्या वेळी हे मतदार आपल्या मतदान अधिकाराचा दोन ठिकाणी वापर करतात. यापुढे याला आळा घालण्यासाठी मुख्य निवडणूक अधिकारी महाराष्ट्र राज्य यांनी राज्यव्यापी आधार जोडणी मोहीम सुरू केली आहे. या मध्ये मतदान कार्डला आधार कार्ड जोडल्या गेल्याने मतदाराला एकाच ठिकाणच्या मतदानाचा अधिकार राहणार आहे. या मुळे जरी दोन ठिकाणचे मतदान कार्ड असले तरी या ठिकाणी काही उपयोग होणार नाही. यामुळे बोगस मतदानाला यापुढे आधार लिंक असल्याने आळा बसणार आहे. रविवारी महाड तालुक्यात मंडळ अधिकारी संतोष तांबे यांच्या मार्गदर्शना खाली दासगाव, वहूर, केंबुर्ली, वीर, टोळ, दाभोळ या गावांमध्ये या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या पाच गावांत एका दिवसात २२०० लोकांचे आधार मतदान कार्डला लिंक करण्यात आले. दासगाव मध्ये तलाठी महेश केसरकर, केंद्रस्तरीय अधिकारी सुजित नगरकर, नाजरीन अनवारे, स्वाती जाधव काम करत आहेत.



# एनएसएसच्या विद्यार्थ्यांकडून निर्माल्य संकलन

**कर्जत : प्रतिनिधी**

नेरळ येथील मातोश्री सुमती चिंतामणी टिपणीस महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांनी अनंत चतुर्दशीच्या विसर्जन सोहळ्यात भक्तांनी आणलेले निर्माल्य संकलन करण्याचे काम केले. ४० विद्यार्थ्यांनी साधारण १५ टन निर्माल्य संकलन करण्यासाठी नेरळ ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना मदत केली.



अनंत चतुर्थी निमित्ताने गणपती विसर्जन सोहळा नेरळ ग्रामपंचायतीकडून येथील गणेश घाटावर आयोजित केला जातो. महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागातील विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने निर्माल्य संकलनासाठी नेरळ ग्रामपंचायतला मदत केली.

नेरळ गणेश घाटावर विसर्जनासाठी येणाऱ्या गणेश मूर्ती आणि त्या भक्तांसोबत असलेले निर्माल्य हे विद्यार्थी घेवून निर्माल्य कलशात साठवून ठेवत होते. तर काही विद्यार्थी त्याबाबत भक्तांना सहकार्य करण्याचे आवाहन करीत होते. नेरळ महाविद्यालयामधील राष्ट्रीय सेवा योजनेच्या ४० विद्यार्थ्यांच्या टीमने तब्बल १५ टन निर्माल्य संकलन करण्याचे काम केले.नेरळ ग्रामपंचायतीचे कर्मचारी निर्माल्य धरणाच्या पाण्यात कोणीही भक्त टाकणार नाही याची काळजी घेत होते. त्यामुळें धरणाच्या पाण्यात यावेळी कोणत्याही प्रकारचे निर्माल्य वाहून जाताना दिसले नाही.

निर्माल्य संकलन कार्यक्रमाची संकल्पना महाविद्यालयातील प्राचार्य डॉ. नंदकुमार इंगळे यांनी राबविली असून त्याचे नियोजन राष्ट्रीय सेवा योजना विभाग प्रमुख प्रा. सोनम गुप्ता, राष्ट्रीय सेवा योजना विभाग सहकार्यक्रम अधिकारी प्रा. अनंत घरत यांनी केले. महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी केलेल्या निर्माल्य संकलन बद्दल नेरळ ग्रामपंचायतचे सरपंच उषा पारधी, उपसरपंच मंगेश म्हसकर तसेच सर्व सदस्य यांनी कौतुक केले.



**खोपोली : भारतीय जनता युवा मोर्चाचे शहर सरचिटणीस विनायक माडपे यांना वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देताना भारतीय जनता पक्षाचे शहर अध्यक्ष इंदरमल खंडेलवाल, सरचिटणीस हेमंत नांदे, कामगार आघाडीचे जिल्हा प्रतिनिधी सूर्यकांत देशमुख, युवा मोर्चा शहराध्यक्ष अजय इंगुलकर, युवा मोर्चा माजी अध्यक्ष संजय कचरे व अन्य.**

# खालापुरात स्वामी समर्थ मठाचे भूमिपूजन

**खालापूर : प्रतिनिधी**

खालापुरातील नरहर पाटील यांच्या घरी ३४ वर्षांपासून श्री स्वामी समर्थ मठ असून स्वामीसेवकांनी शनिवारी नवीन जागेवर समीर पाटील व नरहरी पाटील यांच्या हस्ते मठाचे भूमिपूजन केले. तहसीलदार आयुब तांबोळी, सर्वेद्रनाथ गुरू देवेंद्रनाथ गुरुजी, यादवेंद्रनाथ गुरू शंकर महाराज व अशोक परब उपस्थित होते.

(छाया : अमेय नाझरे)



**श्रीवर्धन : दिवेआगर समुद्र किनाऱ्यावर गणरायाला भावपूर्ण वातावरणात निरोप देण्यात आला.**

# पाली पोलीस ठाण्याच्या बाप्पाला वाजत गाजत निरोप





**पाली : प्रतिनिधी**

सण-उत्सव असो की पोलीस दल नेहमीच बंदोबस्तात गुंतलेला असतो. नाक्यावर, मोक्याच्या ठिकाणांवर डोळ्यात तेल घालून कुठलाही अनुचित प्रकार घडणार नाही, यासाठी पोलीस दक्ष असतात. ऑन ड्युटी २४ तास जनतेच्या सुरक्षिततेचा वसा घेऊन काम करीत असलेल्या पोलिसांना स्वत:च्या घरच्या सणावाराला जाण्यापेक्षा कर्तव्य पार पाडण्याची जबाबदारी महत्त्वाची वाटते. गणेशोत्सवात सालाबादप्रमाणे यावर्षी देखील पाली पोलीस स्थानकात गणेशाची प्रतिष्ठापना करण्यात आली होती. गणेशोत्सवात कायदा, शांतता आणि सुव्यवस्था राखण्यासाठी पोलीसांनी चोख कर्तव्य बजावले. त्यानंतर शनिवारी (दि.१०)पाली पोलीस स्थानकातील बाप्पाचे वाजत गाजत विसर्जन करण्यात आले. यावेळी पोलिसांनी देखील ठेका धरला होता. रात्री उशिरापर्यंत ही विसर्जन मिरवणूक चालली.

ही मिरवणूक पोलीस निरीक्षक विश्वजीत काईंगडे यांच्या मार्गदर्शनाखाली निघाली. यावेळी सहाय्यक पोलीस निरीक्षक अजित साबळे आदींसह पोलीस कर्मचारी व सामान्य नागरिकदेखील सहभागी झाले होते.

# कुष्ठरोग शोधमोहीम

**अलिबाग : जिमाका**


महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अधिपत्याखालील कुष्ठरोग निर्मूलन कार्यक्रमांतर्गत रायगड जिल्ह्यात १३ ते ३० सप्टेंबर या कालावधीत कुष्ठरोग शोधमोहीम व राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रमांतर्गत सक्रिय क्षयरोग शोध मोहीम राबविण्यात येणार आहे.

जिल्ह्यातील १५ तालुके व महानगरपालिका क्षेत्रात ही मोहीम यशस्वीपणे राबविण्यासाठी एकूण लोकसंख्या २१ लाख ४८ हजार ७७३चे सर्वेक्षण होणार असून त्यासाठी एकूण १ हजार ६६२ आरोग्य पथके व ३३२ पर्यवेक्षक नेमण्यात आली असून एकूण ४ लाख ८१ हजार ७५२ घरांमध्ये सर्वेक्षण होणार आहे. आदिवासी भागातील पाडे,वस्त्या, डोंगराळ भाग, आदी भागात कुष्ठ व क्षयरोगाविषयी स्थानिक पातळीवरील लोकप्रतिनिधींच्या मदतीने प्रभावी जनजागृती करण्याचे नियोजन असल्याचे सहाय्यक संचालक डॉ. आर. एच. बाविस्कर यांनी कळविले आहे.

तरी दि.१३ ते ३० सप्टेंबर २०२२ या कालावधीत राबविण्यात येणाऱ्या या मोहिमेत आपल्या घरी तपासणीसाठी येणाऱ्या आरोग्य पथकातील कर्मचाऱ्यांना योग्य ते सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किरण पाटील व सहाय्यक संचालक डॉ. आर. एच. बाविस्कर यांनी जिल्ह्यातील नागरिकांना केले आहे.

## रोड सेफ्टी वर्ल्ड सिरीज

# इंडिया लिजेंड्सची विजयी सलामी



### दक्षिण आफ्रिका लिजेंड्सवर ६१ धावांनी मात

**कानपूर : वृत्तसंस्था**

रोड सेफ्टी वर्ल्ड सिरीजमध्ये इंडिया लिजेंड्सने कानपूरमध्ये दक्षिण आफ्रिका लिजेंड्सचा ६१ धावांनी पराभव करीत विजयी सलामी दिली. स्टुअर्ट बिन्नीने ४२ चेंडूंत ८२ धावांची धडाकेबाज खेळी केली, तर त्यानंतर राहुल शर्माच्या १७ धावांत तीन बळींमुळे भारताने विजय साकारला.

नाणेफेक जिंकून इंडिया लिजेंड्सने प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर सचिन तेंडुलकर हा नमन ओझासोबत सलामीवीर म्हणून मैदानात उतरला. आपल्या डावाला चांगली सुरुवात केल्यानंतर चौथ्या षटकात सचिनने मखाया एनटिनीच्या चेंडूला चौकार लगावला. एका षटकानंतर वेगवान गोलंदाज योहान व्हॅन डर वॅथच्या चेंडूवर त्याने वरच्या बाजूला बॅट फिरवून चेंडूला सीमापार पाठवले. हा शॉट पाहून पुन्हा एकदा स्टेडियममध्ये 'सऽऽचिन सऽऽचिन'चा नारा घुमला. त्याने १५ चेंडूंत १६ धावा केल्या, तर ओझाने १८ चेंडूंत २१ धावा जोडल्या. यानंतर सुरेश रैना आणि बिन्नी यांनी मिळून डावाला स्थैर्य मिळवून दिले आणि ६४ धावांची भागीदारी केली. युसूफ पठाणने १५ चेंडूंत ३५ धावा करीत भारताला २० षटकांत ४ बाद २१७ धावा पूर्ण करण्यास मदत केली.

दक्षिण आफ्रिकेने ४३ धावांची सलामी दिली. त्यानंतर मात्र राहुल शर्मा आणि प्रग्यान ओझा यांनी १२ षटकांत ९० धावांत प्रत्येकी दोन गडी बाद केल्याने आघाडीची फळी कोसळली. दक्षिण आफ्रिकेचा कर्णधार जॉन्टी र्‍होड्सने २७ चेंडूंत नाबाद ३८ धावा करीत एकाकी झुंज दिली, पण त्याला साथ न मिळाल्याने अवघ्या १५६ धावांमध्येच आफ्रिकेचे आव्हान संपुष्टात आले.

# टीम इंडियाला मोठा झटका

### अष्टपैलू रवींद्र जडेजा वर्ल्डकपमधून बाहेर?

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

ऑक्टोबर-नोव्हेंबरमध्ये होणार्‍या टी-२० विश्वचषक स्पर्धेसाठी भारतीय संघाची घोषणा या आठवड्यात होऊ शकते. याआधी टीम इंडियासाठी एक वाईट आणि एक चांगली बातमी समोर आली आहे. चांगली बातमी म्हणजे जखमी जसप्रीत बुमराह आणि हर्षल पटेल यांनी फिटनेस चाचणी पास केली आहे. त्यांचा भारतीय संघात समावेश केला जाऊ शकतो आणि वाईट बातमी म्हणजे अष्टपैलू रवींद्र जडेजा या वर्ल्डकपमधून बाहेर पडला आहे.



'इनसाइडस्पोर्ट'च्या रिपोर्टमध्ये ही माहिती देण्यात आली आहे. या रिपोर्टनुसार रवींद्र जडेजाच्या उजव्या गुडघ्याला दुखापत झाली होती. त्यावर यशस्वी ऑपरेशन झाले आहे, पण या शस्त्रक्रियेमुळे जडेजा टी-२० विश्वचषकापर्यंत ठीक होण्याची शक्यता नगण्य आहे. अशा स्थितीत तो स्पर्धेतून बाहेर पडला आहे.

काही दिवसांपूर्वी जडेजानेही त्याचे फोटो इस्टाग्रामवर शेअर केले होते. यात त्याने त्याच्यावर झालेल्या शस्त्रक्रियेची माहिती दिली. लवकरात लवकर मैदानात परतण्याचा प्रयत्न करणार असल्याचे जडेजाने सांगितले होते. जडेजाने फोटोसोबत कॅप्शनमध्ये लिहिले की, शस्त्रक्रिया यशस्वी झाली. अनेकांनी पाठिंबा दिला, मी तुमचा आभारी आहे. लवकरच मी मैदानात परतण्याचा प्रयत्न करेन. शुभेच्छांबद्दल सर्वांचे आभार.'

दरम्यान, रवींद्र जडेजाऐवजी फिरकीपटू अक्षर पटेलला पहिली पसंती दिली जाऊ शकते. अक्षर याआधी २०१५चा विश्वचषक खेळला होता. वॉशिंग्टन सुंदर हा स्टार फिरकी अष्टपैलू खेळाडूही दुखापतींमुळे बराच काळ संघाबाहेर होता. आशिया चषकापूर्वी तो झिम्बाब्वेचा दौरा करणार होता, परंतु इंग्लंडमध्ये रॉयल लंडन वनडे चषक खेळताना झालेल्या दुखापतीमुळे तो पुन्हा एकदा मालिकेतून बाहेर पडला. शाहबाज अहमद: शाहबाजची शक्यता कमी आहे, कारण त्याने अद्याप आंतरराष्ट्रीय सामना खेळलेला नाही. झिम्बाब्वे दौर्‍यासाठी अष्टपैलू शाहबाजचा संघात समावेश करण्यात आला होता, मात्र त्याला पदार्पणाची संधी मिळाली नाही, परंतु शाहबाजने आयपीएलमध्ये चमकदार कामगिरी केली आहे.

# संदीप पाटील प्रथमच 'एमसीए' अध्यक्षपदाची निवडणूक लढविणार

**मुंबई : प्रतिनिधी**

भारताचे माजी क्रिकेटपटू संदीप पाटील प्रथमच मुंबई क्रिकेट संघटनेच्या (एमसीए) अध्यक्षपदाची निवडणूक लढवणार आहेत. २८ सप्टेंबर रोजी 'एमसीए'ची निवडणूक होणार असून आपण अध्यक्षपद भूषवण्यासाठी इच्छुक असल्याचे पाटील यांनी सांगितले.

माधव मंत्री यांच्यानंतर कोणत्याही माजी खेळाडूने 'एमसीए'चे अध्यक्षपद सांभाळलेले नाही. अजित वाडेकर आणि दिलीप वेंगसरकर या माजी कसोटी कर्णधारांना 'एमसीए' अध्यक्षपदाच्या निवडणुकीत पराभव पत्करावा लागला होता. ६६ वर्षीय संदीप पाटील यांनी २९ कसोटी आणि ४५ एकदिवसीय सामन्यांत भारताचे प्रतिनिधित्व केले. १९८३च्या विश्वचषक विजेत्या भारतीय संघातही त्यांचा समावेश होता. खेळाडू म्हणून निवृत्त झाल्यानंतर त्यांनी भारत, भारत 'अ' आणि केनिया या संघांचे प्रशिक्षकपद सांभाळले तसेच त्यांनी २०१२ ते २०१६ या कालावधीत भारतीय क्रिकेट नियामक मंडळाच्या (बीसीसीआय) निवड समितीचे अध्यक्षपद भूषवले होते.



**मुंबई क्रिकेटने मला खूप काही मिळवून दिले आहे. 'एमसीए'चे माझ्या आयुष्यात खूप मोठे योगदान आहे. आता या योगदानाची मला परतफेड करायची आहे.**
**-संदीप पाटील, माजी क्रिकेटपटू**

'गेल्या निवडणुकीतही मी अध्यक्षपदासाठी इच्छुक होतो, मात्र मी एका क्रीडा वाहिनीवर समालोचन करीत असल्याने हितसंबंधांच्या नियमामुळे मी अर्ज भरला नाही. यंदा मात्र मी निवडणूक लढवणार आहे,' असे पाटील यांनी सांगितले. 'एमसीए'च्या अध्यक्षपदाची निवडणूक लढवण्याची पाटील यांची ही पहिलीच वेळ असेल. यापूर्वी १९९६च्या 'एमसीए' निवडणुकीत पाटील यांची कार्यकारिणी समिती सदस्यपदी निवड झाली होती.



## राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेतून नीरजची माघार

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

अ‍ॅथलेटिक्स विश्वातील प्रतिष्ठेच्या डायमंड्स लीगच्या अंतिम टप्प्यात विजेतेपदाला गवसणी घातल्यानंतर नीरज चोप्राने दुखापतीच्या कारणास्तव राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेतून माघार घेतली आहे. ही स्पर्धा २९ सप्टेंबरपासून सुरू होणार आहे.

नीरजने डायमंड्स लीगच्या अंतिम टप्प्यात ८८.४४ मीटर भालाफेक करताना सुवर्णपदक पटकाविले. ही कामगिरी करणारा नीरज पहिला भारतीय खेळाडू ठरला होता. स्नायूची दुखापत अजून पूर्ण बरी झालेली नाही. प्रशिक्षक डॉ. क्लॉस बाटरेनेईट्झ यांच्याशी चर्चा केल्यानंतर आपण राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेतून माघारीचा निर्णय घेतल्याचे नीरजने म्हटले आहे.

# शेवटच्या वनडे सामन्यातही अ‍ॅरोन फिंचने केले निराश

**सिडनी : वृत्तसंस्था**

न्यूझीलंडविरूद्धच्या एकदिवसीय मालिकेतील पहिले दोन सामने जिंकून ऑस्ट्रेलियाने २-१ अशी विजयी आघाडी घेतली आहे. तिसरा सामना रविवारी (दि. ११) रंगला. ऑस्ट्रेलियाच्या एकदिवसीय संघाचा कर्णधार अ‍ॅरोन फिंचने आपल्या कारकिर्दीतील शेवटचा एकदिवसीय सामना खेळला. फिंच मागील मोठ्या कालावधीपासून खराब फॉर्मचा सामना करीत आला आहे. शेवटच्या एकदिवसीय सामन्यातून फिंचने चाहत्यांना निराश केले आहे. कारकिर्दीतील शेवटच्या सामन्यात फिंच केवळ पाच धावा करून बाद झाला. त्याला टीम साउदीने बाद केले.



न्यूझीलंडविरुद्धच्या तीन सामन्यांच्या एकदिवसीय मालिकेतील शेवटच्या सामन्यात अ‍ॅरोन फिंच नेहमीप्रमाणे सलामीला आला आणि तो १३ चेंडूंत पाच धावा काढून टीम साउदीच्या गोलंदाजीवर त्रिफळाचीत झाला. फिंच यंदाच्या वर्षातील १४वा एकदिवसीय आंतरराष्ट्रीय सामना खेळण्यासाठी मैदानात उतरला होता, पण त्याला एकही अर्धशतक झळकावता आले नाही. लक्षणीय बाब म्हणजे यंदाच्या वर्षात तो तब्बल पाच वेळा शून्यावर बाद झाला आहे.

फिंचच्या नेतृत्वात ऑस्ट्रेलियाचा संघ विश्वविजेता बनला होता, मात्र सध्या खराब फॉर्मचा सामना करत असलेल्या फिंचने न्यूझीलंडविरूद्धच्या मालिकेत केवळ १० धावा केल्या आहेत. पहिल्या सामन्यात पाच धावा, तर दुसर्‍या सामन्यात खाते न उघडताच तो तंबूत परतला होता. या सामन्यात केलेल्या पाच धावांच्या जोरावर त्याने संपूर्ण मालिकेत १० धावांची दुहेरी धावसंख्या उभारली. एकदिवसीय क्रिकेटला राम राम केला असले तरी फिंच टी-२०मध्ये खेळताना दिसणार आहे.

फिंचने २०१३मध्ये ५० षटकांच्या या फॉरमॅटमध्ये पदार्पण केले आणि तेव्हापासून तो १४६ सामने खेळला आहे. त्यातील १४२ डावांमध्ये त्याने तीन वेळा नाबाद राहून ५,४०६ एवढ्या धावा केल्या आहेत. या फॉरमॅटमधील त्याची सर्वोच्च धावसंख्या नाबाद १५३ आहे, ज्यात १७ शतके आणि ३० अर्धशतकांचा समावेश आहे.

# मराठमोळ्या भावनाची जागतिक पॉवरलिफ्टिंगमध्ये विक्रमी कामगिरी

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

मराठमोळ्या भावना भावे-टोकेकर हिने इंग्लंडमधील मँचेस्टर येथे नुकत्याच झालेल्या जागतिक पॉवरलिफ्टिंग अजिंक्यपद स्पर्धेत पूर्ण पॉवरलिफ्टिंग आणि बेंच प्रेस इव्हेंटमध्ये ७५ किलो वजनी गटात अव्वल क्रमांक पटकाविला. इतकेच नाही तर तिने आधीचे चार विश्वविक्रम मोडीत काढले. आश्चर्य म्हणजे ती या स्पर्धेत मास्टर ३ अ‍ॅथलिट (वय ५०-५४) म्हणून सहभागी झाली होती.

भावना एका भारतीय लष्करी अधिकार्‍याची पत्नी आहे, दोन किशोरवयीन मुलांची आईही आहे आणि सध्या तिने वयाची ५० वर्ष पूर्ण केली आहेत. गृहिणी असलेल्या भावनाने



वयाच्या ४१व्या वर्षी वजन उचलण्यास सुरुवात केली आणि आज ती यशस्वी पॉवरलिफ्टर आहे. इन्टाग्रामवर तिचे हजारो चाहते आहेत.

भावनाचे कुटुंब मूळचे पुण्याचे. तिची मातृभाषा मराठी आहे. मध्य प्रदेशात जन्मलेल्या भावनाचे कुटुंब गुजरातमध्ये स्थायिक झाले. बागकामासारख्या उपक्रमांमध्ये ती नियमितपणे सहभागी होत असे. ती जिल्हास्तरावर टेबल-टेनिसही खेळली. गुजरातमधील पंचमहाल संघाचे प्रतिनिधित्व तिने केले. भारतीय हवाई दलाचे फायटर पायलट आणि कारगिल वॉर हिरो ग्रुप कॅप्टन श्रीपाद टोकेकर यांच्याशी भावनाने लग्न केले. जुलै २०१९ मध्ये रशियामध्ये ओपन एशियन पॉवरलिफ्टिंग चॅम्पियनशिपमध्ये भारतासाठी चार सुवर्णपदके जिंकली. त्यानंतर तिने मागे वळून पाहिले नाही.

# शारापोवाने सेरेनाला दिला होता निवृत्ती न घेण्याचा सल्ला

**मॉस्को : वृत्तसंस्था**

अमेरिकेची स्टार टेनिसपटू सेरेना विल्यम्सने निवृत्त होत असल्याचे सूतोवाच केले आहे. सेरेनाने लवकरच निवृत्ती घेणार असल्याचे सांगितल्यानंतर जभरातून वेगवेगळ्या प्रतिक्रिया व्यक्त केल्या जात आहेत. दरम्यान, रशियाची माजी टेनिसपटू मारिया शारापोवाने सेरेनाला तिने लगेच संन्यास घेऊ नये, असा सल्ला वर्षभरापूर्वीच दिला होता. याबाबतची माहिती खुद्द मारिया शारापोवाने दिली.



मारिया शारापोवाने सेरेना विल्यम्सला आताच निवृत्ती घेऊ नको असा सल्ला वर्षभरापूर्वीच दिला होता. मागील वर्षी मेट गाला समारंभात मारिया शारापोवा आणि सेरेना विल्यम्स यांची भेट झाली होती. 'आम्ही मागील वर्षी एकमेकांना भेटलो. या भेटीमध्ये आमच्यात निवृत्तीबद्दल चर्चा झाली. त्या वेळी मी आज जे खेळाडू आहेत, त्यांच्यापेक्षा तू उत्तम खेळतेस. त्यामुळे तू टेनिस कोर्टमध्ये जायला हवे, असे विल्यम्सला सांगितले होते,' असे मारियाने सांगितले आहे.

# ...म्हणून आम्ही खराब ठरत नाही!

### आशिया चषकातील प्रदर्शनावर प्रशिक्षक द्रविडची प्रतिक्रिया

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

अफगाणिस्तानविरुद्धच्या सामन्यात भारताने विजय मिळवला असला तरी पाकिस्तान आणि श्रीलंकेविरुद्ध झालेला सामना गमावल्याने भारताचा आशिया चषकातील प्रवास संपला आहे. दरम्यान, आशिया चषकातील या खराब प्रदर्शनानंतर भारतीय संघाचा मुख्य प्रशिक्षक राहुल द्रविडने प्रतिक्रिया दिली. आम्ही दोन सामने हरलो म्हणून आम्ही खराब संघ ठरत नाही, असे तो म्हणाला.

टी-२० सामन्यांमध्ये जिंकण्यासाठी मार्जिन कमी असते. पाकिस्तान आणि श्रीलंकेविरुद्धचे दोन्ही सामने जिंकणे सोपे नव्हते. हे सामने शेवटच्या षटकापर्यंत पोहचले. आम्ही या पराभवातून बरच काही शिकलो आहे. दोन सामने आम्ही हरलो म्हणून त्यावर ओव्हर रिॲक्ट होण्याची गरज नाही. त्यामुळे आमचा संघ खराब आहे, असे होत नाही. गेल्या आठ ते नऊ महिन्यांत आम्ही चांगले क्रिकेट खेळलो आहे, असे द्रविडने नमूद केले.

दरम्यान, २०१६ आणि २०१८ या दोन्ही वर्षी भारताने आशिया चषक स्पर्धा जिंकली होती. त्यामुळे यावेळी भारतीय संघाकडून मोठ्या अपेक्षा होत्या, मात्र भारताला यंदा विजेतेपद राखता आले नाही. सुपर ४च्या दोन सामन्यांमध्ये पराभव झाल्यानंतर भारताला स्पर्धेतून बाहेर जावे लागले.


॥ भावपूर्ण श्रध्दांजली ॥



**कै. सौ. योगिता मनिष देशमुख**

आपणांस कळविण्यास अत्यंत दु:ख होत आहे की, श्री. हरिभाऊ भाऊराव देशमुख यांची सून कै. सौ. योगिता मनिष देशमुख यांना भाद्रपद शु. ८, रविवार, दि. ०४/०९/२०२२ रोजी अल्पशा आजाराने देवाज्ञा झाली, ईश्वर सत्तेपुढे इलाज नाही, त्यांच्या आत्म्यास चिरशांती लाभो, हिच ईश्वर चरणी प्रार्थना.

दशक्रिया विधी : मंगळवार १३/०९/२०२२ रोजी सकाळी १०.०० वा. श्री क्षेत्र संगमेश्वर, ता.मुरबाड येथे.
श्रध्दांजली कार्यक्रम : बुधवार १४/०९/२०२२ रोजी सकाळी ११.०० वा. जेष्ठ नागरिक संघ हॉल, पनवेल येथे.

-: शोकाकुल :-
श्री. बबन नानाजी देशमुख व समस्त देशमुख परिवार

-: घरचा पत्ता :-
आराधना को.ऑप.हौ.सोसा., फ्लॅट नं. ए-२०४, बिरमोले हॉस्पिटल जवळ, पनवेल.

टीप : मामा शिवाय पागोटे स्विकारले जाणार नाहीत.


दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणार्‍या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणार्‍या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com